## आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेसाठी भारताचा प्रस्ताव



**दुबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुबईत सुरू असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक जलवायू कारवाई शिखर संमेलनाला उपस्थिती दर्शविली. या ठिकाणी त्यांनी उपस्थितांना संबोधितही केले. या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांच्यामध्ये संतुलन राखल्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून भारत जगासमोर उभा आहे. तसेच या वेळी त्यांनी या संदर्भातील पुढील आंतरराष्ट्रीय परिषद भारतात घेण्याचा प्रस्ताव ठेवला. 'भारतात जगातील १७ टक्के लोक राहतात, तर वैश्विक कार्बन उत्सर्जनात भारत चार टक्क्यांहून कमी आहे. भारताने पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेदरम्यान खूपच चांगला समन्वय राखत जगासमोर विकासाचे एक मॉडेल सादर केले आहे,' असे सांगत पंतप्रधान मोदींनी २०२८मध्ये भारतात पर्यावरणासंदर्भातील शिखर संमेलनाच्या आयोजनाचा प्रस्ताव ठेवला.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १३५

www.ramprahar.com

शनिवार, २ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


उसर प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू/२

थकीत घरपट्टीधारकांना लोकअदालतीची नोटीस/५

दिव्या गायकवाडची राष्ट्रीय खो-खो संघात निवड/८


# लोकसभेसाठी तयारीला लागा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कर्जतमध्ये प्रतिपादन

**कर्जत : प्रतिनिधी**

मार्चच्या पहिल्या आठवड्यात लोकसभा निवडणूक लागू शकते, असा माझा अंदाज आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून जास्तीत जास्त खासदार एनडीए विचाराचे निवडून द्यायचे आहेत. बारामती, शिरूर, रायगड, सातारा या खासदारकीच्या जागा आपण लढवणार आहोतच. याशिवाय आपली ताकद असलेल्या दुसऱ्याही जागा असतील तर शोधून काढा. त्या ठिकाणी भाजप, शिवसेनेशी चर्चा करून प्रश्न सोडवू, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी (दि.१) येथे केले.



कर्जत येथे सुरू असलेल्या राष्ट्रवादीच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय वैचारिक शिबिराचा समारोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भाषणाने झाला. त्या वेळी ते बोलत होते. पाच राज्यांच्या निवडणुका झाल्यावर आम्ही तिन्ही पक्षांचे नेते १५ डिसेंबरपर्यंत एकत्र बसणार आहोत. शिवाय घटक पक्षांना सोबत घेऊन जाणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिराला प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते व अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, क्रीडामंत्री संजय बनसोडे, अन्न व औषध प्रशासनमंत्री धर्मारावबाबा आत्राम, महिला बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव, सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राज्य समन्वयक ईश्वर बाळबुधे, सामाजिक न्याय सेल प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस नायकवडी, स्थानिक नेते सुधाकर घारे आदी उपस्थित होते.

राज्यात सुरू असलेली चिथावणीखोर भाषणे दोन्ही बाजूच्यांनी थांबवावीत. राज्यात जातनिहाय जनगणना करण्यात यावी. राज्यात एकोपा ही आपली संस्कृती आहे आणि त्यासाठी राज्यात दंगली घडू देणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

### इंडिया आघाडीवर टीका

*उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंडिया आघाडीवर टीका करताना म्हटले की, भाजप सरकारमध्ये मंत्री राहिलेले आज अनेक इंडिया आघाडीसोबत आहेत. मागील इतिहास विसरता येणार नाही. देशात अनेक पक्ष भाजपसोबत राहून आता इंडिया आघाडीमध्ये आहेत. याच इंडिया आघाडीमध्ये नेता अद्याप ठरविता आला नाही. बैठक कुठे घ्यायची याचा विचार त्यांना महिनाभर आधी करावा लागतो. दुसरीकडे एक मजबूत नेता म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगात आपल्या देशाची शान वाढविण्याचे काम केले आहे. त्यांच्यासोबत आम्ही आहोत. आमची विचारधारा कायम ठेवून गेलो आहोत. महाराष्ट्रात शब्दाचा पक्का अशी काही अंशी माझी ओळख आहे हे तुम्ही जनतेला ठासून सांगितले पाहिजे.*

संघटनेच्या सर्व सेल प्रमुखांनी एका महिन्यात सर्व पदाधिकाऱ्यांच्या नेमणूक कराव्यात यासाठी प्रांत अध्यक्षापासून या निर्णयाची अंमलबजावणी केली पाहिजे, असे सांगून ३१ डिसेंबरपर्यंत अंमलबजावणी न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची खुर्ची जाईल व दुसऱ्याला जबाबदारी दिली जाईल, असा इशारा या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. आता माझ्याबरोबर सगळ्यांना जास्तीचे काम करावे लागणार आहे. सोशल मीडियाचा वापर पुरेपूर केला पाहिजे. नुसती वृत्ते देऊन पक्ष वाढत नाही, तर त्यासाठी वेळ द्यावा लागतो. संपर्क राहिला पाहिजे. पदाधिकाऱ्यांनी सर्वसमावेशक असले पाहिजे. सर्व घटकांना सोबत घेऊन काम करा. मी स्पष्ट वक्ता आहे. मला छक्के पंजे जमत नाही. सर्वगुणसंपन्न शिकून कोण येत नाही. माझ्यापेक्षा युवक-युवतींमध्ये टॅलेंट असेल तर त्यांचेही ज्ञान मी घेतले पाहिजे. कमीपणा वाटून घेऊ नका, असा दिलखुलास सल्लाही उपमुख्यमंत्री पवार यांनी पदाधिकाऱ्यांना दिला.

निवडणूक चिन्हाबाबत आयोग निर्णय घेईल. आता इथून निघाल्यावर कामाला लागायचे आहे. १२० दिवस शिल्लक आहेत. झोकून देऊन काम करूया व एक नवीन इतिहास घडवूया, असे आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी कार्यकर्त्यांना केले.



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून पनवेल तालुक्यात विकासकामांचा धडाका

## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आणि पनवेलचे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून मतदारसंघात विकासाची अनेक कामे सातत्याने सुरू असतात. अशाच प्रकारे त्यांच्या निधीतून मोर्बे, कुत्तरपाडा, महोदर कातकर वाडी आणि नितळस येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१) करण्यात आले.



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

आमदार प्रशांत ठाकूर यांचा स्थानिक ग्रामविकास निधी (२५.१५) आणि सामाजिक विकास योजनेंतर्गत मोर्बे येथे हनुमान मंदिर ते गावदेवी मंदिर रस्ता काँक्रीटीकरण करणे, अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे आणि बौद्धवाडा अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे ही कामे करण्यात येणार आहेत. कुत्तरपाडा येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा वार्षिक योजनेतून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करण्यात येणार आहे. नितळस येथे मुख्य रस्ता डांबरीकरण करणे, व्यायामशाळा नूतनीकरण करणे आणि बैठक हॉलकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण करणे ही कामे करण्यात येणार आहेत. या सर्व कामांचे भूमिपूजन झाले, तर महोदर कातकरीवाडी येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा वार्षिक योजनेतून रस्ता साकारला आहे. त्याचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, विश्वजीत पाटील, मोर्बे येथे भाजपचे विभागीय अध्यक्ष बाळाराम उसाटकर, उपसरपंच प्रभावती परशुराम नावडेकर, ग्रामपंचायत सदस्य रमेश नावडेकर, सुवर्णा जनार्दन भगत, एकनाथ नाईक, माजी सरपंच नारायण भगत, भगवान म्हात्रे, रामदास म्हात्रे, दिनेश फडके, जनार्दन भगत, परशुराम नावडेकर, जयवंत खोपकर, हरिश्चंद्र नावडेकर, चंद्रकांत पाटील, सचिन फडके, पिंटू म्हात्रे, माजी सरपंच जनार्दन कोळंबेकर, अरुण पाटील, जीवन नावडेकर, हभप हेदरबुवा भोपी, रघुनाथ नावडेकर, प्रभाकर नावडेकर, रवींद्र पाटील, **(पान २ वर..)**

### निवडक

#### कोकणकन्या एक्स्प्रेसखाली माय-लेकींची आत्महत्या

**माणगाव :** नवऱ्याच्या कारभाराला कंटाळून महिलेने दोन मुलींसह कोकणकन्या एक्स्प्रेसखाली आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि.१) पहाटे ३.१०च्या सुमारास माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथे घडली. मृतांमध्ये रिना जयमोहन नायर (३६), त्यांच्या मुली जिया जयमोहन नायर (१५) व लक्ष्मी जयमोहन नायर (१२) यांचा समावेश आहे. या घटनेची नोंद गोरेगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

#### मिझोराममधील मतमोजणी आता ४ डिसेंबर रोजी

**ऐझॉल :** पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांची मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार होती, मात्र त्या दिवशी रविवार असून तो ख्रिश्चन लोकांमध्ये महत्त्वाचा असल्याने ख्रिश्नचबहुल मिझोराममधील मतमोजणी ४ डिसेंबर रोजी होणार आहे. तसे निवडणूक आयोगाने जाहीर केले.

**पनवेल : सत्य संस्कृती चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने नवीन पनवेल सेक्टर २ येथील मैदानावर पद्मभूषण तुलसी पीठाधीश्वर रामानंदाचार्य स्वामी आणि धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी या ठिकाणी भेट देत दर्शन घेतले. माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर संतोष शेट्टी, माजी नगरसेवक समीर ठाकूर, भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष राजश्री वावेकर, ट्रस्टचे अध्यक्ष पं. मोहन जोशी, खजिनदार ललित मेहता, सेक्रेटरी मोहनचंद्र जोशी, सुशीलकुमार जोशी, मोहन सिंग बिस्ट आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल कांबळे)





### संविधान विषयावर ॲड. उज्वल निकम यांचे उद्या व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच पुरस्कृत सधम्म सामाजिक संस्था आणि विवेक विचार मंच पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.३) संविधान विषयावर ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.उज्वल निकम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. खांदा कॉलनीतील श्री कृपा हॉलमध्ये सकाळी १० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रशांत ठाकूर यांची, तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ज्ञ, विश्लेषक डॉ.जी.के. डोंगरगावकर यांची उपस्थिती असणार आहे. या वेळी आयोजकांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

# अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू

## राज्य शासन भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी -मुख्यमंत्री

**नागपूर :** राज्य शासन भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. विदर्भासह राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून शासनाला अहवाल प्राप्त होताच तातडीने शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाल्यानंतर माध्यमांशी मुख्यमंत्री शिंदे यांनी संवाद साधला. अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे राज्याच्या विविध भागात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासंदर्भात नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर करण्याचे निर्देश यंत्रणांना देण्यात आले. त्यानुसार राज्यात नुकसानीचे पंचनामे



युद्धपातळीवर सुरू आहेत. दोन ते तीन हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यभरातून पिकांच्या प्राप्त नुकसानीचे अहवाल एकत्र आल्यानंतर शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. खासदार कृपाल तुमाने, आमदार ॲड.आशिष जयस्वाल या वेळी उपस्थित होते. तत्पूर्वी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी आदींनी मुख्यमंत्र्यांचे विमानतळावर स्वागत केले.







(छाया : विकास म्हात्रे)

# माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आरपीएलचे उद्घाटन

**मोहोपाडा : रामप्रहर वृत्त**

ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. (टीआयपीएल)च्या सौजन्याने मोहोपाडा येथे आयोजित करण्यात आलेल्या आरपीएल अर्थात रोटरी प्रीमियर लीगचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१) करण्यात आले.

आरपीएलचे यंदाचे तिसरे पर्व आहे. ही स्पर्धा १, २, ३, ८, ९, १० डिसेंबर रोजी मोहोपाडा येथील एनआयएसएम मैदानात खेळली जाणार आहे. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास पनवेल सेंट्रल रोटरी क्लबचे अध्यक्ष रतन खरोल, पनवेल सिटी रोटरी क्लबचे अध्यक्ष कमांडर जांबेकर, डॉ. संतोष जाधव, सिकंदर पाटील, गणेश कडू, पंकज पाटील, प्रदीप खलाटे आदी उपस्थित होते.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मैदानात उतरून फलंदाजी करीत फटकेबाजी केली.

# महाडच्या सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलला मान्यता

## आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रयत्नांना यश

**महाड : प्रतिनिधी**

महाडकरांसह कोकणवासीयांच्या मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल होण्याच्या मागणीला महाडचे भूमिपुत्र आमदार प्रवीण दरेकर यांनी केलेला पाठपुरावा आणि आमदार भरत गोगावले यांचे सहकार्य यामुळे यश आले आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने महाड तालुक्यातील केंबुर्ली येथील २०० खाटांच्या सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल स्थापन करण्याला मान्यता दिली असल्याची माहिती भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर यांनी शुक्रवारी (दि.१) महाड येथे पत्रकार परिषदेत दिली.



पत्रकार परिषेदस तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहराध्यक्ष निलेश तळवटकर यांच्यासह अनिल मोरे, सुनील सोंडकर, आदिती ताडफळे, संकेत पोरे, सुहास कुडपाने, सागर हिरवे, सुरज बामने आदी उपस्थित होते.

या वेळी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर यांनी सांगितले की, मुंबई-गोवा महामार्गावर सातत्याने होणारे अपघात आणि जखमींना मुंबई, पुणे येथे नेताना गमवावा लागणारा जीव वाचवण्यासाठी महाड परिसरात सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल व्हावे, अशी कोकणवासीयांची अनेक वर्षांपासूनची मागणी होती. या मागणीची दखल महाड-पोलादपूरचे भूमिपुत्र आमदार प्रवीण दरेकर यांनी घेतली आणि ३० जानेवारी २०२३ रोजी राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांना या संदर्भात पत्र दिले. या मागणीचा त्यांनी सातत्याने केलेला पाठपुरवठा आणि आमदार भरत गोगावले यांचे सहकार्य यामुळे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी महाड तालुक्यातील केंबुर्ली येथील शासकीय जागेत २०० खाटांच्या सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलला मान्यता देत तेथे बांधकाम व पद निर्मिती करण्याची स्वतंत्रपणे कार्यवाही सुरू करण्याचे आदेश शासन परिपत्रकान्वये दिले आहेत.

या हॉस्पिटलचा उपयोग महाड, पोलादपूर, माणगाव, श्रीवर्धन, मंडणगड, दापोली, खेड, चिपळुण या तालुक्यातील जनतेला होईल, असेही महामुणकर म्हणाले.

# उसर प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू

## मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार न घेण्याचा निर्धार



**रेवदंडा : प्रतिनिधी**

उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांच्या दालनात मंगळवारी (दि. २८) उसर प्रकल्पग्रस्तांच्या संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समिती व कंपनी व्यवस्थापन यांचेमध्ये झालेल्या अंतिम चर्चेत समितीचा लेखी कराराच्या मागणीचा प्रस्ताव कंपनीने नामंजूर केल्याने समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांचे नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्तांनी शुक्रवारी (दि. १) बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या वेळी रेवदंडा पोलीस ठाणे अंतर्गत मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

गेल इंडिया लि. पेट्रोकॉम्पेक्स उसर येथे नव्याने येत असलेल्या पॉलिमर कंपनी प्रकल्पासाठी नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर, धोटवडे, मल्याण या सहा गावातील २४७ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत, मात्र कंपनीने जमिनी घ्यायच्या वेळी केलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याने प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीच्या वतीने भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांना साकडे घातले होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे उद्योगमंत्री व पालकमंत्री उदय सामंत यांना १४ नोव्हेंबर रोजी निवेदन दिले. याची दखल घेऊन पालकमंत्री उदय सामंत यांनी प्रकल्पग्रस्त व गेल इंडिया कंपनी प्रतिनिधींसह आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक १ मार्च रोजी घेतली होती. त्यामध्ये ६० दिवसांत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी रायगड येथील राजस्व सभागृहात २७ एप्रिल रोजी गेल इंडिया कंपनी प्रतिनिधींसह आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत संघटनेची सभा झाली होती, परंतु आजपर्यंत आश्वासनांची पूर्तता केलेली नाही. म्हणून नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर, धोटवडे, मल्याण या सहा गावातील प्रकल्पग्रस्तांनी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

सहा गावातील प्रकल्पग्रस्तांना कंपनीत कायमस्वरूपी नोकरी देण्याचा लेखी करार करावा, संपादित झालेल्या जमिनीचे १५ टक्के विकसित जमीन द्यावी, प्रकल्पग्रस्त दाखला द्यावा, सर्व्हिस कॉन्ट्रक्टमधील कामगारांना न्युनतम वेतन वर १० टक्के इंक्रिमेंट व ८.३३ टक्के ग्रॅच्युटी द्यावी, स्थानिक सप्लायर्सला मटेरियल समान वितरण करण्यासाठी गेल कंपनी व कॉन्टक्टर यांची समन्वय समिती तयार करावी, परिसरातील गावांना घरपट्टीस दररोज १ क्युबिट मीटर पाणी मोफत द्यावे, कंपनीच्या विद्युत लाईनद्वारे सर्व गावांना कनेक्शन द्यावे, कंपनी सिएसआर फंडातून गावाचे रस्ते, पाणी व इतर सुविधा कराव्यात, प्रकल्पग्रस्तांपैकी कोणास वारस नसेल तर त्यास बेसिक न्युनतम वेतन आजन्म मिळावे, नोकर भरतीत प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य द्यावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

अध्यक्ष निलेश गायकर, उपाध्यक्ष दत्तात्रेय ठाकूर, कार्याध्यक्ष अनंत शिंदे, जनरल सेक्रेटरी निखिल पाटील, सेक्रेटरी आशिष नाईक, संघटक योगेश गुजर, खजिनदार गिरीष पाटील, सहखजिनदार भरत नाईक, सहसंघटक सचिन मोरे, कामगार प्रतिनिधी प्रमोद धसाडे, वृषिकेश कंटक यांच्यासह मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त आंदोलनात सहभागी झाले आहेत.

# महिलेच्या विनयभंगप्रकरणी आरोपीला दोन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी अलिबाग न्यायालयाचे मुख्य न्यायदंडाधिकारी एस. डब्ल्यू. उगले यांनी आरोपीस दोन वर्षे सश्रम कारावास व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. शिल्पेश अनिल पोवळे असे या आरोपीचे नाव आहे.

९ नोव्हेंबर २०१६ रोजी आरोपी शिल्पेश पोवळे पडीत महिलेच्या घरी आला व तुझ्याकडे काम आहे, बाहेर चल असे सांगून तिला घराबाहेर बोलावले. पीडित महिलेने बाहेर येण्यास नकार दिल्यामुळे आरोपी शिल्पेश याने तिला शिवीगाळ करून मारहाण केली, तसेच हात पकडून घरातून बाहेर नेऊन तिचा विनयभंग केला. याबाबत पीडित महिलेने अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार शिल्पेश याच्याविरुद्ध अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबतची सुनावणी मुख्य न्यायदंडाधिकारी एस. डब्ल्यू. उगले यांच्यासमोर झाली. शिल्पेशला दोषी ठरवून मुख्य न्यायदंडाधिकारी उगले यांनी त्यास दोन वर्षे सश्रम कारावास व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात सरकारी वकील नईमा इम्रान घट्टे यांनी फिर्यादीची बाजू मांडली. त्यांना पोलीस हवालदार आर. आर. नाईक, पोलीस हवालदार जी. के. हाके व लिपीक राम ठाकूर यांनी सहकार्य केले.

# मध्य रेल्वेवर उद्या मेगाब्लॉक

**मुंबई** : उपनगरी रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती तसेच सिग्नल यंत्रणेत काही तांत्रिक कामे करण्यासाठी रविवारी (दि. ३) मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या माटुंगा–मुलुंड अप व डाउन जलद मार्गावर, हार्बर मार्गावरील सीएसएमटी–चुनाभट्टी, वांद्रे अप व डाउन मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे, तर पश्चिम रेल्वेवर दिवसा कोणातही मेगाब्लॉक नसणार आहे. माटुंगा–मुलुंड अप व डाउन जलद मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.५५वा.पर्यंत मेगाब्लॉक असेल.

# बेस्टच्या विद्युत विभागातील १२३ नैमित्तिक कामगारांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

## आमदार प्रसाद लाड यांच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत लोकलनंतर बेस्टची सेवा ही मुंबईकरांची दुसरी जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाते, परंतु या बेस्ट उपक्रमाच्या विद्युत विभागात कार्यरत असलेल्या ७२६ कामगारांचा सेवेत कायम सामावून घेण्याबाबत मागील १६ वर्षांपासून संघर्ष सुरु होता. याबाबत या कामगारांनी वेळोवेळी आंदोलनेदेखील केली होती. बेस्टच्या नैमित्तिक कामगारांच्या आंदोलनाची आता यशस्वी सांगता झाली असून आमदार प्रसाद लाड अध्यक्ष असलेल्या आणि श्रमिक उत्कर्ष सभेशी संलग्न असलेल्या द इलेक्ट्रिक युनियनच्या माध्यमातून बेस्टच्या विद्युत विभागातील नैमित्तिक कामगारांचा प्रश्न सुटला आहे.



१२३ नैमित्तिक कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबतचे नियुक्तीपत्र मुंबईतील सह्याद्री शासकीय अतिथीगृह येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१) प्रातिनिधिक स्वरुपात १० कामगारांना प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार प्रसाद लाड, बेस्टचे महाव्यवस्थापक विजय सिंघल, मुख्य महाव्यवस्थापक आर. डी. पाटसुटे, कर्मचारी व्यवस्थापक के. एम.परमाशे, आमदार गोपीचंद पडळकर, द इलेक्ट्रिक युनियनचे संजय घाडीगावकर, श्रमिक उत्कर्ष सभेचे भालचंद्र साळवी आणि बेस्टचे कामगार कर्मचारी उपस्थित होते.

# सायबर गुन्हे रोखण्यासाठी खारघर पोलिसांचे शाळांमध्ये प्रबोधन

**पनवेल : वार्ताहर**

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांविषयी खारघर पोलिसांनी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना मार्गदर्शन केले आहे. सायबर गुन्ह्यांबाबत शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थ्यांकडून पालकांना घरोघरी प्रबोधन केले जाणार असल्यामुळे या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी खारघर पोलिसांकडून जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची बैठक घेऊन त्यांना माहिती दिली जात आहे.

या वेळी तरुण–तरुणींकडून खासगी आयुष्याची माहिती, छायाचित्रे समाजमाध्यमांवर टाकण्याच्या प्रवृत्तीमुळे काही समाजकंटक पैसे उकळत असल्याने सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले, तसेच फसवणूक झाल्यास सायबर गुन्ह्यांबाबतचे कायदे, ऑनलाईन व्यवहारात फसवणूक होण्याच्या पद्धती याशिवाय मुलांच्या हातात मोबाईल दिल्यावर कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी याची माहिती देण्यात आली.

**“ शिक्षकांमुळे चांगली माणसे घडत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडतात. शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यास घराघरात सायबर गुन्ह्यांविषयाची जागरूकता मुलांचा आई–वडिलांशी होणाऱ्या संवादातून करता येईल.**

**–राजीव शेजवळ,**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खारघर**

# सीकेटी महाविद्यालयात व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (सीकेटी) कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे अमृत काळ विमर्ष भारत २०४७ या विषयावर इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स आणि लाईफ लाँग लर्निंग अ‍ॅन्ड एक्स्टेनशन विभाग यांच्या समन्वयाने शुक्रवारी (दि. १) व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आयआयटी बॉम्बेचे प्रा. डॉ. वरदराज बापट व इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स संस्थेच्या संचालिका प्रो. डॉ. स्मिता शुक्ला हे उपस्थित होते, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख प्रा. डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ.एस. बी. यादव, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर यांनी उपस्थिती दर्शविली.

कला शाखेचे प्रमुख प्रा.डॉ. बी. एस. पाटील यांनी प्रस्तावना केली. प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयातील प्रगतीचा आढावा घेतला. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स संस्थेच्या संचालिका प्रो. डॉ. स्मिता शुक्ला यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्रा. डॉ. वरदराज बापट यांनी, जगाचा व भारताचा आर्थिक इतिहास याबद्दल माहिती सांगितली, तसेच विविध मुद्यांद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये आणि अमृत काळाकडील वाटचाल यावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. ए. व्ही. पाटील व आभार प्रदर्शन वाणिज्य शाखेच्या प्रा. पी. आर. शिंदे यांनी केले. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# विठूरायाच्या चरणी भाविकांचे भरभरून दान

**पंढरपूर : प्रतिनिधी**

कार्तिकी यात्रेत भाविकांची संख्या निम्मी होऊनही विठूरायाचरणी भरभरुन दान आले आहे. यंदाच्या कार्तिकी एकादशीनिमित्त विठूरायाच्या चरणी तब्बल चार कोटी ७७ लाखांचे दान आले असून देवाची तिजोरी भरली आहे, तसेच मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या उत्पन्नात एक कोटी ५६ लाखांनी वाढ झालेली आहे. मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी या संदर्भात माहिती दिली.

यंदा राज्यात राज्यात सुरू असलेल्या वातावरणाचा फटका कार्तिकी यात्रेला बसला होता. ऐन दिवाळीत राज्यात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे कार्तिकीला पंढपुरात भाविकांचा ओघ कमी झाल्याचे पाहायला मिळाले. परिणामी भाविकांच्या संख्येत निम्म्याने घट झाली होती, मात्र तरीही भाविकांनी लाडक्या विठुरायाला तब्बल चार कोटी ७७ लाखांचे दान दिले. यात्राकाळात सुमारे तीन लाख ४० हजार ४७८ भाविकांनी चरण दर्शन घेतले तसेच पाच लाख ७१ हजार २२० भाविकांनी मुखदर्शन घेतले असल्याची माहितीदेखील सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# न्हावा शेवा फ्रीपोर्ट टर्मिनलतर्फे आरटीजी ऑपरेटिंगचे प्रशिक्षण

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदराच्या अंतर्गत न्हावा शेवा फ्रीपोर्ट टर्मिनलच्या १९ प्रशिक्षणार्थींनी नुकतेच आरटीजी क्रेन ऑपरेटिंगचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. महिलांचादेखील मोठा सहभाग होता. सर्व प्रशिक्षणार्थींना जेएनपीए बंदराचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

उरणच्या जेएनपीए बंदराच्या अंतर्गत न्हावा शेवा फ्रीपोर्ट बंदराने येथील प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थींना आरटीजी क्रेन ऑपरेटिंगचे प्रशिक्षण दिले. सुमारे तीन महिने कालावधीचे हे प्रशिक्षण १९ जणांनी पूर्ण केले आहे. आरटीजी क्रेन ऑपरेटर प्रशिक्षणार्थींमध्ये महिलांचा विशेष सहभाग होता. त्याचबरोबर प्रशिक्षणार्थींमध्ये केवळ स्थानिकांना प्राधान्य देण्यात आले होते.

या वेळी जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ, मुख्य व्यवस्थापक मनिषा जाधव, कामगार विश्वस्त दिनेश पाटील व रवींद्र पाटील आदी उपस्थित होते. या सर्वांनी प्रशिक्षणार्थींचे विशेष अभिनंदन करून न्हावा शेवा फ्रीपोर्ट टर्मिनलचेदेखील अभिनंदन केले आणि प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास न्हावा शेवा फ्रीपोर्ट टर्मिनलचे सीइओ अनिरुद्ध लेले, सीओओ अनिल नारायणन, मानव संसाधन विभाग प्रमुख जान्हवी नौटियाल यांची उपस्थिती होती.



**पान १ वरुन**

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून पनवेल तालुक्यात विकासकामांचा धडाका

बाळाराम पाटील, सचिन दिसले, बळीराम भोईर, एकनाथ फराड; कुत्तरपाडा येथे शिरवली ग्रामपंचायत सरपंच रखुमाई हरिभाऊ बोंडे, उपसरपंच नंदा लक्ष्मण पाटील, माजी उपसरपंच भाऊदास शिनारे, भाजप कार्यकर्ते लक्ष्मण पाटील, तुकाराम आदईकर, सीताराम आदईकर, दीपक बोंडे, चंदर आदईकर, नारायण आदईकर, कातोर पाटील, अनंता पाटील, वामन आदईकर, कैलास आदईकर, गणेश आदईकर, अनंता पाटील, हरिश्चंद्र पाटील, गुरूनाथ पाटील, सुरेश पाटील, आंबे आदईकर, संतोष आदईकर, नंदू भोईर, आबो आदईकर, चंद्रकांत भगत, बाबुराव भगत, महेश पाटील, लहू मुंढे, राकेश पाटील, आकाश पाटील, रोहिदास वाघमारे, अनंता पारधी, बाळाराम भगत, सोमा हिंदोळा; महोदर येथे उपसरपंच नंदा पाटील, लहूदास शिनारे, लक्ष्मण पाटील, चंद्रकांत भगत, बाबुराव भगत, महेश पाटील, राकेश पाटील, आकाश पाटील, रोहिदास वाघमारे, अनंता पारधी, नंदू पारधी, चंद्रभागा भगत; नितळस येथे धर्मा पावशे, शरद पावशे, कैलास मढवी, भार्गव सांगडे, जयराम काठे, सोपान काठे, कैलास पावशे, शरद पाटील, रमाकांत पावशे, साजन पावशे, उदय सांगडे, मारूती पावशे, वसंत पावशे, धनाजी म्हात्रे, हनुमान पाटील, भास्कर मढवी, प्रकाश मढवी, राजेश पावशे, शशिकांत साठे, अविनाश गायकर, चंद्रकांत पावशे, भरत चौधरी, नंदू भोपी, अशोक भोपी, प्रमोद पावशे, रोशन पावशे, रोहित सांगडे, मुकेश पावशे, ग्रामपंचायत सदस्य दर्शना पावशे, सुमिता काठे, प्रल्हाद मढवी, संदीप मढवी, काठे, दिनेश काठे, भगवान चौधरी, शरद भोईर, संजय भोईर, प्रमोद भोईर, विनोद भोईर, हरिश्चंद्र भोईर, हरिश्चंद्र पावशे, बाळकृष्ण पावशे, बामा पावशे, बामा पावशे, माया पाटील, शिवाजी दरे, संकेत पावशे, राजेश काठे, धनाजी काठे, महेश भोपी, रूतिक दरे, तुळशीराम भोपी, संतोष म्हात्रे, डॉ.समिर पावशे, डॉ.गजानन पावशे, परशुराम पावशे, शुभम पावशे, रामाकांत पावशे, तानाजी काठे, सोमनाथ सांगडे, ज्ञानेश्वर गायकर, लालू गायकवाड, किशोर पावशे, प्रियांशू मढवी, रोशन कातकरी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त अलिबागमध्ये जनजागृतीपर रॅली

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या नियोजनानुसार जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त जनजागृतीपर प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा रुग्णालय येथे अपर जिल्ह्याधिकारी सुनील थोरवे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव अ‍ॅड. अमोल शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रभातफेरीची सुरुवात करण्यात आली.





प्रभात फेरीकरिता जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी (घुगे), लायन्स क्लब श्रीबागचे अध्यक्ष संजय रावले, अ‍ॅड. कला पाटील, मेट्रन भोपी, नर्सिंग स्कूलच्या प्राचार्य गायत्री म्हात्रे उपस्थित होत्या. प्रभातफेरीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, जेएसएम कॉलेज, पीएनपी कॉलेज, नर्सिंग स्कूलच्या विद्याथी–विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमास कार्यालयीन अधीक्षक राजेश किणी, जिल्हा सहाय्यक लेखा रवींद्र कदम, जिल्हा सहाय्यक एम अँड ई रश्मी सुंकले, जिल्हा सहाय्यक कार्यक्रम संपदा मळेकर डापकु, आयसीटीसी प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे, अमित सोनवणे, समुपदेशक अर्चना जाधव, सचिन जाधव, कल्पना गाडे, मोबाईल आयसीटीसी व्हॅन समुपदेशक रामेश्वर मुळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, वाहनचालक अतिश नाईक, क्लिनर रुपेश पाटील, रक्तपेढी प्रयोगशाळा तंत्रज्ञ हेमकांत सोनार, वाहनचालक महेश घाडगे, एआरटी अधिकारी डॉ. नालंदा पवनारकर, कर्मचारी समुपदेशक दीप्ती चव्हाण, अक्षय बेरड, डेटा मॅनेजर कोमल लोखंडे, स्टाफ नर्स पल्लवी पडवळ, सीसीसी प्रेमा खंडागळे, सर्व अधिकारी व कर्मचारी हे उपस्थित होते.

# पनवेल कोळीवाडा झाला चकाचक!

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची कार्यतत्परता

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल मनपा हद्दीतील प्रभाग १९मधील कोळीवाडा येथील अभिदिप सोसायटीच्या बाजूला मासळी विक्रेते घाण टाकत असल्यामुळे तेथे दुर्गंधी पसरत होती. याबाबत तेथील नागरिकांच्या तक्रारी आल्याने त्याची दखल घेऊन शुक्रवारी (दि. १) माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. आता या ठिकाणी झाडांच्या कुंड्या ठेवण्यात आल्या. त्याबद्दल नागरिकांनी त्यांचे आभार मानले.



रहिवाशांनी मानले आभार

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग १९मधील कोळीवाडा परिसरात अभिदिप सोसायटीच्या बाजूला मच्छीविक्रेते घाण टाकत असल्यामुळे तेथे दुर्गंधी पसरत होती. कोळीवाड्यातील भाजप कार्यकर्ते हरिश्चंद्र भगत, किरण भोईर, दत्ता पाटील, गणेश भगत व अभिदीप सोसायटीच्या तक्रारीवरून माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सूचनेवरून शुक्रवारी महापालिकेचे आरोग्य अधिकारी शैलेश गायकवाड, प्रभाग १९चे अधिकारी महेंद्र भोईर यांनी तेथे स्वच्छता करून घेतली, तसेच कचरा टाकू नये यासाठी तेथे फुलझाडांच्या कुंड्या ठेवल्या व लक्ष ठेवण्यासाठी दोन माणसे नेमण्यात आली आहेत.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्वरित कारवाई करून परिसर स्वच्छ करून घेतल्याबद्दल अभिदिप सोसायटीचे रहिवाशी व परिसरातील नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

# पनवेल बस आगारात एड्स जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय जनआरोग्य प्रशिक्षण व संशोधन संस्था मुंबई, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पनवेल आगार व आधार परिवर्तन संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने शुक्रवारी (दि. १) जागतिक एड्स दिनानिमित्त आरोग्य प्रदर्शन, एचआयव्ही रक्ततपासणी शिबिर आणि आरोग्यविषयक माहितीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय जनआरोग्य प्रशिक्षण व संशोधन संस्था, मुंबईचे डायरेक्टर डॉ. सुनील गित्ते, पनवेल आगार व्यवस्थापक सुजीत डोळस, आधार परिवर्तन प्रोजेक्ट डायरेक्टर विजय नायर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे संयोजक डॉ. सुधीर वंजे, राष्ट्रीय जनआरोग्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेच्या डेप्युटी कमिशनर डॉ. शुभांगी बाविस्कर उपस्थित होते.

कार्यक्रमात या प्रशिक्षण संस्थेतील सुमारे ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी प्रवाशांना आणि राज्य परिवहन महामंडळाच्या ड्रायव्हर, कंडक्टर आणि कार्यशाळेच्या कर्मचाऱ्यांना एचआयव्हीची बाधा कशी होते, त्याची लक्षणे, तपासणी, उपचार याविषयी माहिती दिली, तसेच एचआयव्हीचा संसर्ग होऊ नये म्हणून काय केले पाहिजे याविषयीचे मार्गदर्शन पोस्टरच्या माध्यमातून केले. सुमारे १५ प्रवाशांनी तपासणी सुविधेचा लाभ घेतला. २५०० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आणि प्रवाशांनी लाभ घेतला. आधार परिवर्तन संस्थेचे कार्यकर्ते आणि तपासणी व्हॅन उपस्थित होते.

# वेश्वी सरपंच संदीप कातकरी ठरले अपात्र

## तीन अपत्ये असल्याने जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय

**उरण : बातमीदार**

वेश्वी गावातील सरपंचपदाचे अपक्ष उमेदवार तक्रारदार गोपाळ पाटील यांनी ठाकरे गटाचे विद्यमान सरपंच संदीप कातकरी यांना तीन अपत्ये असल्याने ते सरपंचपदासाठी अपात्र असल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या न्यायालयात अपील दाखल केले होते. त्या संदर्भात सुनावण्या घेऊन दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकल्यानंतर अपात्र ठरवत त्यांचे सरपंचपद रद्द करण्यात आले आहे.

यासंदर्भात गटविकास अधिकारी उरण यांनी संबंधित ग्रामपंचायतीत चौकशी करून संदीप कातकरी यांना तीन अपत्ये असल्याचा रिपोर्ट दिला होता. संदीप कातकरी यांच्या पहिल्या पत्नीपासून दोन अपत्ये व दुसऱ्या पत्नीपासून एक अपत्य अशी एकूण तीन अपत्ये असल्याचे चौकशीदरम्यान निष्पन्न झाले असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

त्यांची पहिली पत्नी ही उरणच्या डाउरनगर येथील असून दुसरी पत्नी वासांबे, खालापूर येथील आहे. गुरुवारी (दि. ३०) जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी सर्व पुराव्यांची पडताळणी करून विद्यमान सरपंच संदीप कातकरी यांचे सरपंचपद व सदस्यपद अपात्र ठरविले आहे.

> **जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी माझ्याबाबतीत दिलेला निर्णय हा एकतर्फी आहे. माझे कोणतेही म्हणणे त्यांनी एकून घेतले नाही. या निर्णयाविरोधात मी मुंबई उच्च न्यायालयात जाणार आहे. तक्रारदार गोपाळ पाटील यांनी माझ्यावर केलेले आरोप खोटे आहेत.**
> **–संदीप कातकरी, सरपंच वेश्वी ग्रामपंचायत, उरण**

# कळंबोलीत पोलिसांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

## रायफल, बंदुक, पिस्तूल, मशीनगनची दिली माहिती



**कळंबोली : प्रतिनिधी**

खाकी वर्दीतले पोलीसकाका समोर आले तरी सर्वांचीच भंबेरी उडते. पोलिसांबाबत असलेले गैरसमज दूर करून पोलिसांशी दोस्ती करण्याची किमया कळंबोलीतील न्यू मुंबई इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (दि.१) केली. कळंबोलीतील पोलीस मुख्यालयात या विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी भेट देऊन पोलिसांचे कामकाज जवळून पाहिले.

या वेळी पोलीस वापरत असलेली सर्व शस्त्रे जवळून पाहण्याची संधी या विद्यार्थ्यांना मिळाली. विद्यार्थ्यांनी पोलीसकाकांशी संवाद साधून पोलिसांविषयी असणारी भीतीच कायमचे दूर करून टाकली अन् पोलिसकाकांशी मैत्री केल्याचे दिसून आले.

न्यू मुंबई इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थी, शिक्षकांनी कळंबोली पोलीस मुख्यालयात भेट दिली. उपायुक्त संजय कुमार पाटील, निरीक्षक शांताराम वाघमोडे, तसेच रायगड आरएसपीचे समादेशक विलास पाटील, शितल कुमार शिंदे यांनीदेखील भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

पोलीसकाकांनी विद्यार्थ्यांना आधुनिक रायफल, बंदुक, पिस्तूल, मशीनगन सर्वांची माहिती दिली. सोबत बँजो पथक वाजवून दाखविले. विद्यालयाच्या वतीने विद्यालयातील मुख्यधापक सुवर्ण कांबळे यांनी शिक्षकांचे, पोलीस मुख्यालयातील सर्वांचे आभार मानले.

# दोन नायजेरियन दहा लाखांच्या एमडीसह ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

अमली पदार्थविरोधी पथकाने तळोजा येथील पेंधर फाटा येथे अमली पदार्थांच्या विक्रीसाठी आलेल्या दोन नायजेरियन नागरिकांना अटक केली आहे. जुड आयडोको (३६) व उचे इझे (२८) अशी या दोघांची नावे असून त्यांच्याजवळ १० लाख ९० हजारांचे एमडी आढळून आले आहे.

तळोजा येथील पेंधर फाटा येथे दोन नायजेरियन व्यक्ती एमडी विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने तळोजा येथील कळंबोली–मुंब्रा रोडवर पेंधर फाटा येथे सापळा लावला होता.

या वेळी दोघे नायजेरीयन नागरिक एमडी विक्री करताना आढळून आले. त्यामुळे अमली पदार्थ विरोधी पथकाने दोघांची झडती घेतली असता १० लाखांचे एमडी आढळले आहे.



**पनवेल : मानसरोवर रेल्वे स्टेशन परिसरात शुक्रवारी सकाळी मोठ्या प्रमाणात आग लागली होती. महापालिकेचे माजी नगरसेवक विकास घरत यांनी सतर्कता दाखवत आपल्या सहकाऱ्यांसह ही आग आटोक्यात आणली. या ठिकाणी मोठ्या संख्येने दुचाकी पार्क करण्यात आल्या होत्या. त्यामुळे मोठा अनर्थ घडला असता, परंतु तो टळला. या वेळी सचिन पाटील, रवी कडू, अतुल म्हात्रे यांच्यासह इतर उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये जाणवतोय गारवा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपूर्ण नोव्हेंबर महिन्यात गायब झालेल्या थंडीचा हंगाम अखेर आता सुरू झाला आहे. त्यामुळे पनवेलकरांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच थंडी जाणवण्यास सुरुवात झाल्याने नागरिक सुखावले आहेत.

# ‘सीकेटी’त पॉप्युलर सायन्ससंदर्भात मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (सीकेटी) कॉलेज (स्वायत्त) येथे होस्ट पॅथोजन इंटरप्ले इन द इमर्जन्स अँड रिइमर्जन्स ऑफ व्हायरल डीसीजेस या विषयावर पॉप्युलर सायन्स व्याख्यानाचे इंडियन वुमेन सायंटिस्ट असोसिएशन आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ३०) आयोजन करण्यात आले होते.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून एनआयआरआरसीएच परेल येथील बायोकेमिस्ट्री आणि व्हायरोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. वैनव पटेल व इंडिअन वुमेन सायंटिस्ट असोसिएशनच्या संयुक्त सचिव डॉ. सुपर्णा कामत उपस्थित होते, तसेच विभागातील ८५ विद्यार्थी व शिक्षकांनी उपस्थिती दर्शविली.

डॉ. पटेल यांनी महामारीविषयक तत्त्वे संबोधित केली जसे की, विषाणूजन्य संसर्गाच्या अस्तित्वासाठी त्यांची प्रासंगिकता, घटना आणि त्यानंतरच्या महत्त्वाच्या भूतकाळातील उदयोन्मुख आणि पुन्हा उदयास येत असलेल्या विषाणूजन्य संसर्गांचे पुनरावलोकन, जे बाल आणि माता आरोग्याशी संबंधित आहे तसेच तांत्रिक साधने, लसीकरण कथा, त्यांच्या मर्यादा, तीव्र व्हायरल इन्फेक्शन्सची आव्हाने याबद्दल चर्चा केली.

प्रस्तावना व पाहुण्यांची ओळख सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एन. सी. वडनेरे यांनी केली. आभार प्रा. जी. एस. साठे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचाल निशा जांगीड हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अन्वेष वेमुला, प्रा. नमिता गरुडे आणि प्रा. श्वेता हुंबरवाडी यांनी परिश्रम घेतले.

















**पनवेल : भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आणि पनवेलचे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वेगवेगळ्या निधीतून तालुक्यातील मोर्बे, कुत्तरपाडा, महोदर कातकरवाडी आणि नितळस येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. कार्यक्रमास पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, सदस्य, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी अरुणशेठ भगत यांचे स्वागत करण्यात आले.**

## संपादकीय

# सुरळीत कामकाजासाठी

संसदेचे हिवाळी अधिवेशन सोमवार, ४ डिसेंबरपासून सुरू होत आहे. तत्पूर्वी राज्यसभा सचिवालयाने सदस्यांसाठी कठोर नियमावली जारी केली आहे. नियमावलीतील अनेक सूचना पूर्वापार चालत आलेल्या असल्या तरी वंदे मातरम् आणि जयहिंद अशा घोषणांना मनाई करण्यात आल्यामुळे नियमावलीने साऱ्यांचेच लक्ष वेधले आहे. संसदेची प्रतिष्ठा राखली जाऊन सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठीच सचिवालयाने हे पाऊल उचलले असावे.

**संसदेतील सदस्य, मग ते सत्ताधारी पक्षातील असोत किंवा विरोधी पक्षातील त्यांच्याकडून कायमच विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची अपेक्षा केली गेली आहे. संसदेचा सन्मान राखणे ही या लोकप्रतिनिधींची महत्त्वाची जबाबदारी मानली गेली आहे. संसद हे लोकशाहीचे पवित्र मंदिर मानले जाते. त्यामुळे संसद आणि विधिमंडळातीलही कामकाज तसेच आमदार-खासदारांचे तेथील वर्तन, त्यांचा कामकाजातील सहभाग, मुख्य म्हणजे त्यांची उपस्थिती आदी बाबतीत नेहमीच गांभीर्याने चर्चा होते व काही गोष्टी अपेक्षेनुसार न आढळल्यास चिंताही व्यक्त केली जाते. त्यामुळेच अलिकडच्या काळात वेळोवेळी संसदेचे कामकाज रोखले गेल्यास त्यात वारंवार अडथळे आणल्यास तसेच अध्यक्षांच्या आसनासमोर केल्या जाणाऱ्या घोषणाबाजीबद्दल, कागदपत्रे फाडण्याच्या प्रकारांबद्दल खंत व्यक्त केली गेली आहे. या पार्श्वभूमीवरच राज्यसभा सचिवालयाने सदस्यांसाठी नियमावली जारी केली असावी. संसदेची प्रतिष्ठा राखली जाऊन सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठीच हे पाऊल उचलले गेले असणार. सध्या राज्यसभा सदस्यांकरिता ही नियमावली जारी झाली असली तरी भविष्यात लोकसभेतही तसेच नियम लागू होऊ शकतील. 'वंदे मातरम' आणि 'जयहिंद' या घोषणा तमाम भारतीयांसाठी कायमच स्फूर्तिदायक ठरल्या आहेत. अगदी स्वातंत्र्यलढ्याच्या काळापासून या घोषणांनी देशातील नागरिकांमध्ये देशप्रेमाची भावना जागी केली आहे. त्यामुळे आता अकस्मात या घोषणांना संसदेत बंदी घालण्याचे पाऊल संसद सचिवालयाला का उचलावे लागले असावे हा गंभीर प्रश्न आहेच. अलीकडच्या काळात संसदीय कामकाज म्हणजे कामकाज बंद पाडणे असे काहीसे समीकरण रूढ होऊ लागले होते. कायदे बनवताना, धोरण आखताना सभागृहांमध्ये चर्चा न होणे ही कुप्रथाच आहे. कोणे एकेकाळी याच संसदेत उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची नेतेमंडळी गंभीर आणि विचारप्रवर्तक भाषणे करीत. त्यामुळे त्याच सभागृहात अभ्यासू चर्चेऐवजी हुल्लडबाजी सुरू असलेली पाहणे हे अनेकांसाठी निश्चितच क्लेशकारक आहे. कुठेतरी या हुल्लडबाजीला अटकाव करण्याचा हेतू या नियमावलीच्या मागे असावा असे वाटते. अधिवेशनादरम्यान राज्यसभा सदस्यांनी अनावश्यक व वादग्रस्त विषय टाळावेत असेही नियमावलीत म्हटले आहे. आतापर्यंत खासदार सभागृहात कोणताही महत्त्वाचा मुद्दा मांडण्यासाठी देण्यात आलेली नोटीस सार्वजनिक करत आले आहेत, परंतु नव्या नियमावलीनुसार तसे करता येणार नाही. जोपर्यंत सभापती एखाद्या विषयासंदर्भात सदस्याने दिलेली नोटीस मंजूर करत नाहीत आणि अन्य सदस्यांना त्याबाबत कळवत नाहीत तोपर्यंत ती नोटीस सार्वजनिक करता येणार नसल्याचेही सचिवालयाने म्हटले आहे. इतर काही नियम हे पूर्वापार चालत आलेलेच आहेत. सभागृहात धन्यवाद, आभार, जयहिंद, वंदे मातरम अशा घोषणा देऊ नयेत ही सूचना बहुदा घोषणांचा अतिरेक टाळण्याकरिता केली गेली असावी. एकंदरच हुल्लडबाजी टाळून सभागृहात गंभीर चर्चा व्हावी व सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठीच संसद सचिवालयाने वेळीच हे पाऊल उचलले असावे.**

# आज राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन

औद्योगिक तसेच वैयक्तिक पातळीवरील प्रदूषणाने अनेक ठिकाणी धोक्याची पातळी ओलांडली आहे. याचा विपरीत परिणाम माणसांबरोबर इतर जीवसृष्टी, नैसर्गिक संसाधने आणि हवामानावरही होत आहे. प्रदूषणाच्या दुष्परिणांबाबत सर्वसामान्यांमध्ये जागरूकता वाढली पाहिजे याची गरज आता जगभरातच निर्माण झाली आहे. २ डिसेंबर १९८४च्या रात्री भोपाळजवळील युनियन कार्बाइडच्या कारखान्यातून विषारी वायूची गळती होऊन हजारो लोक मृत्युमुखी पडले. या दुर्घटनेची आठवण, विशेषतः औद्योगिक क्षेत्राला राहावी आणि यापुढे असे प्रकार घडू नयेत यासाठी सर्वांनी काळजी घ्यावी म्हणून हा दिवस



भारतात पाळला जातो.

जगातील औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाशी संबंधित दुर्घटनांमध्ये भोपाळ वायू दुर्घटना सर्वात भीषण आहे. अशाच आणखी दिन घटना अणू केंद्राशी संबंधित आहेत एक अमेरिकेतील 'थ्री माईल आयलँड (१९७९)' आणि रशियातील 'चेर्नोबिल (१९८६)'. औद्योगिक क्षेत्राने प्रदूषणकारक पदार्थाबाबत किती काळजी घेतली पाहिजे हे यातून अधोरेखित होते, कारण निष्काळजीपणाचे परिणाम फारच भयंकर होतात. आपल्याकडे विविध प्रकारच्या प्रदूषणांवर नजर आणि नियंत्रण ठेवणारी महामंडळे (पोल्युशन कंट्रोल बोर्ड) आहेत तसेच प्रदूषक कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यासाठी अनेक पद्धती वापरल्या जातात. त्यांमध्ये मैलापाण्यापासून अणुभट्टीतील राखेपर्यंत अनेक प्रदूषकांचा समावेश आहे.

**आपण काय करू शकतो ?**

प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या नियमांना प्रसिद्धी देणे. नियमांची अंमलबजावणी करणे. स्वच्छ औद्योगिक प्रक्रियांना प्रोत्साहन देणे. प्रदुषणाच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता वाढविणे. प्रदूषण होताना आढळल्यास योग्य त्या संस्थेला कळविणे. कारखान्यातून निघणारे सांडपाणी नदीत न सोडणे. शक्यतो सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करून प्रदूषण टाळणे. या अतिशय साध्या वाटणाऱ्या गोष्टीसुध्दा आपण आपल्या जीवनात रुजवल्या तरीसुध्दा प्रदूषण कमी करण्यासाठी आपला हातभार लागू शकतो. शिवाय आपल्याकडून संस्कारातूनच पुढच्या पिढीला हा विचारांचा ठेवा मिळेल, जो अतिशय मौल्यवान आहे. या गोष्टी पाळल्या तरच थोड्या प्रमाणात का होईना पण पुढच्या पिढीसाठी निसर्ग उरेल तरी!

**(साभार : विकासपीडिया)**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

रायगड जिल्हा परिषद, अलिबाग कृषी विभाग नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी राहत असून शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना राबवित असते. रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये नवीन विहिर या घटकाचा लाभ असल्याने जास्तीत जास्त क्षेत्र ओळीताखाली येवून पिक उत्पादनात वाढ होवून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होण्यास हातभार लागणार आहे. काय आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना जाणून घेऊया लेखातून.

अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना बदललेल्या परिस्थितीची गरज विचारात घेवून जमीनीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या दृष्टिकोनातून सध्याची प्रचलीत विशेष घटक योजना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या नावाने सन २०१६-१७ पासून राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी** :-लाभार्थी हा अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकरी असला पाहीजे, शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहीजे, ज्या शेतक-यांना नविन विहिर या घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी किमान ०.४० हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक आहे, सामुहिक शेतजमीन किमान ०.४० हे. धारण करणारे एकत्रित कुटुंब नविन विहिर या घटकाचा लाभ घेणेसाठी पात्र असेल, ज्या शेतकऱ्यांना नविन विहिर व्यतिरिक्त इतर घटकांचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी किमान ०.२० हे. शेतजमीन असणे आवश्यक आहे, या योजनेंतर्गत कमाल शेतजमीनीची अट ६.०० हे आहे, शेतकऱ्याच्या नावे जमीनधारनेचा ७/१२ दाखला व ८ अ उतारा असणे आवश्यक आहे, (नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्राबाहेरील), लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे, लाभार्थ्यांचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे, स्वर्गीय कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनांतर्गत जमीन वाटप झालेल्या शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा, अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांचे सर्व मार्गानी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.१ लाख ५० हजार पेक्षा जास्त नसावे, ज्या शेतकऱ्यांचे सर्व मार्गानी मिळणारे उत्पन्न रु.१ लाख ५० हजार चे मर्यादेत आहे अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसिलदार यांचेकडून सन २०२२-२३ चे उत्पन्नाचा अद्यावत दाखला घेणे व अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील, लाभार्थी अपंग असल्यास अपंगत्वाचा दाखला प्रस्तावासोबत सादर करावा.

**लाभार्थ्यांना देण्यात येणारा लाभ** :- या योजनेमध्ये सन २०२३-२४ या वर्षात पुढील घटकासाठी रकमेच्या मर्यादेत अनुदान देय राहील. नवीन विहीर रु.२ लाख ५० हजार, जुनी विहीर दुरुस्ती रु.५० हजार, इनवेल बोअरिंग रु.२० हजार,पंच संच रु.२० हजार, वीज जोडणी आकार रु.१० हजार, शेततळयाचे प्लास्टीक अस्तरीकरण रु.१ लाख, सुक्ष्म सिंचन, ठिबक सिंचन रु.५० हजार, तुषार सिंचन रु.२५ हजार.

या योजनेंतर्गत सात बाबी असून लाभ पॅकेज स्वरुपात लाभ द्यावयाचा आहे. पुढील तीन पॅकेजमधील एकाच पॅकेजचा लाभ लाभार्थ्यास अनुज्ञेय राहील.

**नवीन विहिर पॅकेज :-** नवीन विहिर, पंपसंच, वीजजोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग. जुनी विहिर दुरुस्ती पॅकेज: जुनी विहिर दुरुस्ती, पंपसंच, विजजोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग.

**शेततळयाचे प्लास्टिक अस्तरीकरण :-** शेततळयाचे प्लास्टीक अस्तरीकरण, पंपसंच, विजजोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच त्याचप्रमाणे वरील घटकांचा पॅकेज स्वरुपात लाभ आवश्यक नसल्यास स्वतंत्र बाबींचा लाभ घेता येईल. तसेच जर शेतकऱ्यांस महावितरण कंपनीकडून सोलरपंप मंजुर झाला असेल तर पंपसंच विजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु.३० हजार) यायोजनेंतर्गत नविन विहीर खोदणेसह अन्य सर्व बार्बीची एकत्रितपणे अंमलबजावणी करणाऱ्या लाभार्थ्यांना कमाल दोन वर्षाचा कालावधी अनुज्ञेय राहिल. तसेच नविन विहिर खोदण्याव्यतिरिक्त अन्य बाबींकरीता निवडलेल्या लाभार्थ्यांना चालु आर्थिक वर्षातच संबंधित बाबींची अंमलबजावणी करणे बंधनकारक ठरेल.

**लाभार्थी अर्ज :-** या योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या योजनांतर्गत च-क-उ्इढ चे र्हीीिं://ारहरवलीं.ारहरीींर.सीं.ळप/षरीशी/श्रेसळप/श्रेसळप या संकेत स्थळावर लाभ घेवू इच्छिणाऱ्या अर्जदाराने आवश्यक कागदपत्रांसद ऑनलाईन अर्ज दाखल करावा.

या योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समिती यांचेकडे संपर्क साधावा. या योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद सत्यजीत बडे व कृषी विकास अधिकारी, रायगड जिल्हा परिषद मिलिंद चौधरी यांनी कळविले आहे.

**- श्री.मिलिंद चौधरी,**
**कृषी विकास अधिकारी,**
**रायगड जिल्हा परिषद**

# मराठी साहित्यिक अनंत काणेकर

आधुनिक मराठी कवी, चतुरस्त्र लेखक व वृत्तपत्रकार अनंत काणेकर यांचा जन्म मुंबई येथे झाला असून शिक्षण बी.ए. एलएल.बी. झाल्यावर हायकोर्टाची वकीलीची सनदही त्यांनी मिळविली. मुंबईतील नाटयमन्वंतर' (१९३३) या प्रयोगशील नाट्यसंस्थेचे एक संस्थापक. १९३५ ते १९३९ या काळात मुंबईच्या चित्रा या साप्ताहिकाचे ते संपादक होते. १९४१ ते १९४६ पर्यंत मुंबईच्या ऋखालसा महाविद्यालयात' ते मराठीचे प्राध्यापक होते. त्यानंतर मुंबईच्याच सिद्धार्थ महाविद्यालयात ते विभागप्रमुख होते. अनंत काणेकर यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया या लेखातून त्यांच्याविषयी...



**निमित्त**

चांदरात व इतर कविता (१९३३) हा त्यांचा एकमेव काव्यसंग्रह. तत्कालीन काव्यसंकेतांना टाळून लिहिलेल्या त्यांच्या कवितांत प्रादेशिक लोकगीतांचे, विडंबन काव्याचे, पुरोगामी सामाजिक आशयाचे आणि प्रेमभावनेच्या प्रसन्न आविष्काराचे वैशिष्टयपूर्ण दर्शन घडते.

नाटयमन्वंतर या संस्थेमुळे काहीशा संक्रमणकालातील प्रयोगशील मराठी रंगभूमीशी त्यांचा संबंध आला. निशिकांतची नवरी (१९३८), घरकुल (१९४१) व फांस (१९४९) ही त्यांची रुपांतरित नाटके प्रयोगशील रंगभूमीला उपकारक ठरली. धूर व इतर एकांकिका (१९४१) यात त्यांच्या एकांकिका आहेत.

पिकली पाने (१९३४) हा काणेकरांचा पहिला लघुनिबंधसंग्रह होय. १९२५ पासून मराठीत अवतरलेला हा नवीन गद्य साहित्यप्रकार सुस्थिर व संपन्न करण्याचे कार्य फडके-खांडेकरांबरोबरच काणेकरांनीही केले. ऋगणूकाका' हे त्यांच्या लघुनिबंधातील कल्पित पात्र आपल्या पुराणवादी वादप्रियतेने संस्मरणीय झाले आहे. रुढ संकेतांना धक्के देणारी चतुर वैचारिकता, नाट्यपूर्ण शैली व आटोपशीरपणा हे त्यांच्या लघुनिबंधांचे विशेष गुण आहेत. शिंपले आणि मोती (१९३६), तुटलेले तारे (१९३८), उघडया खिडक्या (१९४५) व विजेची वेल (१९५६) हे त्यांचे अन्य लघुनिबंधसंग्रह होत.

धुक्यातून लालताऱ्याकडे ! (१९४०), आमची माती आमचे आकाश (१९५०), निळे डोंगर तांबडी माती (१९५७), रक्ताची फुले (१९५९) खडक कोरतात आकाश (१९६४), सोनेरी उन्हात पाचूची बेटे आणि गुलाबी प्रकाशत बोलक्या लेखण्या (१९६९) ही त्यांची प्रवासवर्णनपर पुस्तके होत. मराठीतील प्रवासवर्णनांना काणेकरांनी वाङ्मयीन दर्जा प्राप्त करुन दिला. स्थलचित्रे, निसर्गचित्रे, व्यक्तिरेखा, प्रसंगचित्रे व समाजचित्रण यांनी संपन्न असलेल्या त्यांच्या प्रवासवर्णनांत त्यांच्या रसिक व बहुश्रुत व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

काणेकरांनी कथालेखनही केले आहे. जागत्या छाया (१९३६), मोरपिसे (१९४०), दिव्यावरती अंधेर (१९४०) व काळी मेहुणी (व इतर गोष्टी) (१९४२) हे त्यांचे कथासंग्रह. मानवी स्वभावातील वैचित्र्याचे वास्तव दर्शन त्यांच्या कथांतून घडते. रुपेरी वाळूमधील (१९४७) रुपककथा नावीन्यपूर्ण व परिणामकारक आहेत.

याशिवाय राखेंतले निखारे (१९४१), हिरवे कंदील (१९४४) व बोलका ढलपा (१९५९) या पुस्तकांत त्यांचे टीकात्मक व अन्य प्रकारचे लेखन आढळते. रसेलनीति (१९४१) व समाजवादाचा फेरविचार (१९४५) ही त्यांची अनुवादित पुस्तके आहेत.

औरंगाबादच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे (१९५७) ते अध्यक्ष होते. १९५८ पासून ते ऋसाहित्य अकादेमी' चे व ऋसंगीत नाटक अकादेमी' चे सदस्य आहेत. ऋमहाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळा'चेही ते सदस्य आहेत. १९६५ साली पद्मश्री होण्याचा बहुमान त्यांना प्राप्त झाला. १९७१ मध्ये ऋसोव्हिएट देश नेहरु पारितोषिका'चे ते मानकरी ठरले.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

**क्लिक...क्लिक...!**



सातारा : अवकाळी पावसाचा तडाखा वीटभट्ट्यांनाही बसला. त्यातून हळूहळू व्यावसायिक सावरत आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल क्रोम की मायक्रोसॉफ्ट एज! कोण आहे बेस्ट?

इंटरनेट ब्राउझर ही युजर्ससाठी अत्यंत महत्त्वाची साधने आहेत, तर सगळ्यात वेब ब्राउझरच्या क्षेत्रात दोन नावं अगदीच प्रसिद्ध आहेत; ती म्हणजे 'गुगल क्रोम आणि (मायक्रोसॉफ्ट एज)'.



गुगल सर्च इंजिन म्हणून ओळखले जाते. तुम्ही अनेक गोष्टी गुगलद्वारे सर्च करता आणि विविध विषयांची माहिती मिळवता. तर मायक्रोसॉफ्ट एज, गुगल क्रोम वेब ब्राउझर हे वापरण्यापूर्वी ते आपल्यासाठी योग्य आहेत का हे लक्षात घेणं आणि त्यांचे फिचर जाणून घेणेसुद्धा महत्त्वाचे आहे. तर आज आम्ही तुम्हाला वेब ब्राउझरपेक्षा गुगल क्रोम सगळ्यात बेस्ट का आहे याची तीन मुख्य कारणं सांगणार आहोत.

१. एक्स्टेंशन लायब्ररी : गुगल क्रोमचे एक निश्चित वैशिष्ट्य त्यांच्या एक्स्टेंशन लायब्ररीमध्ये आहे. गुगल क्रोममध्ये दोन लाखांपेक्षा जास्त एक्स्टेंशन उपलब्ध आहे, जो विविध प्रकारच्या वापरकर्त्यांना पुरवण्यात येतो. ज्यामध्ये ड ब्लॉकिंग, पासवर्ड, विविध भाषा शिकणे आदी गोष्टींचा समावेश आहे. याउलट, मायक्रोसॉफ्ट एजची एक्स्टेंशन लायब्ररी तुलनेत थोडी फिकट आहे. क्रोममध्ये उपलब्ध असलेल्या एक्स्टेंशनचा काही अंशच ऑफर करते. यामुळेच काही वापरकर्ते मायक्रोसॉफ्ट एजपेक्षा गुगलला जास्त प्राधान्य देतात.

२. गुगल डिजिटल इकोसिस्टमसह बरोबर सिमलेस इंटिग्रेशन : गुगल वापरकर्त्यांना सहज आणि एकत्रित अनुभव प्रदान करते. युजर्सना जीमेल, गुगल ड्राईव्ह किंवा इतर गुगल खाती ॲक्सेस करणे, गुगलवर भाषांतर आदी विविध गोष्टींसाठी वापरकर्त्यांना मदत करते. तर दुसरीकडे मायक्रोसॉफ्ट एज या सेवांमध्ये वापरकर्त्यांना सेवा पुरवण्यात कमी पडतात. तसेच मायक्रोसॉफ्ट एज वापरकर्त्यांच्या वर्क फ्लोमध्ये व्यत्यय आणतात आणि वेगवेगळ्या प्लिकेशन्समध्ये नेव्हीगेट करतात.

३. सिक्युरिटी आणि अपडेट : गुगल क्रोम कंपनी युजर्सच्या सुरक्षिततेसाठी क्रोम ब्राउझरवर विकसित होणाऱ्या ऑनलाइन धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी नियमितपणे अपडेट आणि पॅच जारी करत असते. त्यामुळे सुरक्षिततेसाठी क्रोम हे एक सुरक्षित आणि विश्वासू व्यासपीठ राहील. तसेच मायक्रोसॉफ्ट एज युजर्सनादेखील नियमित अपडेट मिळत असतात. पण, गुगल क्रोमच्या तुलनेत थोडं कमी अपडेट मिळतात. त्यामुळे मायक्रोसॉफ्ट एज युजर्सचा डेटा आणि प्रायव्हसी संदर्भात असुरक्षितता वाढू शकते.

## आरोग्य प्रहर

# रोज कढीपत्ता खा अन् झटपट वजन घटवा

निरोगी जीवनशैली आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेकजण वेगवेगळे उपाय शोधत असतात. यात कढीपत्ता आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानला जातो. कढीपत्त्यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी मदत होते. तसेच पाचक प्रणाली सुधारते, ज्यामुळे वजन नियंत्रणात राहते. अशा परिस्थितीत दररोज कढीपत्ता खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतील, याविषयी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना योग इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. हंसाजी योगेंद्र यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



डॉ. हंसाजी योगेंद्र यांच्या म्हणण्यानुसार, कढीपत्ता खाल्ल्यास शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत होते. शिवाय चयापचयाच्या क्षमतेत वाढ होते. कढीपत्त्यात असलेल्या कार्बाझोल अल्कलॉइड्समध्ये लठ्ठपणाविरोधी गुणधर्म असल्याचे मानले जाते. वजन कमी करण्याबरोबरच कढीपत्त्याची पानं पचन सुधारणे, हृदयविकाराचा धोका कमी करणे आणि कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास फायदेशीर मानली जातात.

आहारात अशाप्रकारे करा कढीपत्त्याचा वापर

कढीपत्त्याचे आरोग्यासाठी आवश्यक फायदे मिळविण्यासाठी तुम्ही रोजच्या आहारात त्याचा विविध प्रकारे वापर केला पाहिजे.

१) रोज सकाळी रिकाम्या पोटी काही ताजी कढीपत्त्याची पानं खा, यामुळे शरीरास फायदेशीर पोषक घटक वाढतात आणि आपल्या शरीरातील चयापचय क्रिया सुधारते.

२) स्वयंपाक करताना वेगवेगळ्या पदार्थांमध्ये कढीपत्त्याचा वापर करा. तुम्ही करी, सूप आणि फोडणीचा भात अशा विविध पदार्थांची चव वाढवण्यासाठी कढीपत्ता वापरू शकता.

३) कढीपत्त्यापासून सुगंधी चहा बनवण्यासाठी तुम्ही मूठभर कढीपत्ता पाण्यात उकळवा. यानंतर पाणी गाळून घ्या. आता त्यात लिंबाचा रस आणि थोडे मध घाला. वजन कमी करण्यासाठी हा चहा दररोज झोपेच्या वेळी पिऊ शकता. विशेषत: लठ्ठपणाचा सामना करणाऱ्या लोकांसाठी हा चहा खूप फायदेशीर ठरू शकतो.

डॉ. हंसाजी यांच्या मते कढीपत्त्याच्या पानांमध्ये फॅट बर्न करणारे गुणधर्म आहेत, तसेच जिरे आणि हळदीही शरीरास अतिशय गुणकारी घटक असतात. हळदीत कर्क्यूमिन असते, जे शरीरातील अतिरिक्त चरबी वाढवण्याचे प्रमाण रोकतात. तर जिरे शारीरिक प्रक्रियांचा वेग वाढवून कॅलरी पटकन बर्न करण्यास मदत करते.

# रायगडातील थकीत घरपट्टीधारकांना नोटीस



**अलिबाग : प्रतिनिधी**

थकीत घरपट्टी वसुलीसाठी जिल्हा नपरिषद प्रशासन लोकअदालतीचा सहारा घेणार आहे. जिल्ह्यात ९ डिसेंबर रोजी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असून या लोकअदालतीत २० हजारहून अधिक थकीत घरपट्टी वसुलीची प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने थकीत घरपट्टीधारकांना नोटीस बजावण्यात येत असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी शुक्रवारी (दि. १) याबाबत आढावा घेतला.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशानुसार संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येते. यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे, न्यायालयात वादपूर्व प्रकरणांसह थकीत मालमत्ता कर प्रकरणे ठेवण्यात येणार असून जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून थकीत घरपट्टी वसुलीची प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

थकीत घरपट्टी वसुलीची प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. थकीत घरपट्टीधारकांना नोटीस बजावण्यात येत आहेत. शुक्रवारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी याबाबतचा आढावा व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून घेतला. या वेळी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडून तालुक्यात थकीत असलेली घरपट्टी व थकीत घरपट्टीधारकांना बजावण्यात आलेल्या नोटीसांबाबत माहिती घेतली तसेच ५ डिसेंबरपर्यंत सर्व थकीत घरपट्टीधारकांना नोटीस बजावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या वेळी जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव उपस्थित होते.

## 'जनावरांसाठी पाण्याची सोय करावी'

**चौक** : खालापूर तालुक्यातील वावंढळ येथे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी, अशी मागणी पत्रकार व माजी सरपंच अर्जुन कदम यांनी केली आहे.

वावंढळ येथील तलावाला संरक्षक भिंत बांधली आहे. यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे कार्यकारी अभियंता रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे रॅम्पची मागणी करून वस्तूस्थिती विषद केली होती. हा मुद्दा पटल्याने रॅम्प बांधण्यासाठी सूचित करण्यात आले आहे. आता जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे त्यांना कायमस्वरुपी उपाययोजना करून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## वावंढळ येथील मंदिरात अखंड काकड आरती

**चौक : प्रतिनिधी**

मनुष्य जीवनात असलेला अंधकार दूर सारण्यासाठी आणि नवचैतन्य साधून निर्माण होणारी ऊर्जा याने जीवन प्रकाशमय होते, त्यामुळे वर्षातून एक महिना सर्वांनी काकडा आरती करावी असे आवाहन युवा कीर्तनकार हभप संदिप महाराज यांनी केले.

कोजागिरी पौर्णिमा ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत वावंढळवाडी येथील हनुमान मंदिरात अखंड काकडा आरती सुरू होती. त्या वेळी हभप संदिप महाराज बोलत होते. काकडा आरतीला २५ वर्षे पूर्ण झाल्याने संस्थापक हभप. वै. लहूबुवा यांच्या वारसांचा यथोचित सन्मान करण्यात आला. पत्रकार अर्जुन कदम, हभप. रमेश महाडिक, हभप. अरुण गायकवाड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. हभप कमलाकर काईनकर यांनी सर्वांचे आभार मानले. रामदास काईनकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन करून महाप्रसादाचे वाटप केले.

ग्रामपंचायत सदस्य ललिता काईनकर, माजी सरपंच संध्या निकम, भारती महाडिक यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.



## संभे येथून आळंदीकडे दिंडीचे पायी प्रस्थान

**धाटाव** : गेली २३ वर्षांची यशस्वी परंपरा राखत याही वर्षी रोहे तालुक्यातील संभे येथून आळंदीकडे ताम्हिणी घाटमार्गे पायी दिंडीने गुरुवारी (दि. ३०) प्रस्थान केले आहे.

या वेळी माजी सरपंच राजेश सानप, सरपंच सुरेश महाबळे, संजय सानप, ॲड.महेश घायले, विष्णू लोखंडे, हभप शेळके महाराज, नंदकुमार मरवडे, केशव म्हस्के, सुनील महाडिक, डॉ. मंगेश सानप, रमेश सानप, मंगेश सानप, राम सावंत, गजानन भोईर, अध्यक्ष तुकाराम बांदल, उपाध्यक्ष अनंत सानप, सचिव पांडुरंग सानप, गणेश नलावडे, खजिनदार जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे, संजय संदे, ग्रामस्थ उपस्थित होते.




### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. वाळक्या बाळू पाटील व इतर यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – भेरले, तालुका – पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| ९१ | २<br>पो. ख | ० हे - ३० आर - ३० पॉ.<br>० हे - ०३ आर-८० पॉ | ५ - ०६ |
| | एकूण क्षेत्र | ०हे - ३४ आर—१० | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर "७ दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. विजय रामराव सुरडकर,**
**ठि.: पनवेल** **पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६,
**दि. 2/12/2023** सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**



रयत शिक्षण संस्थेचे,
### महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल
ता. पनवेल, जि. रायगड

### निविदा सूचना

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या 'प्रेरणा' नियतकालिकाच्या छपाईकरिता खालील तपशिलानुसार निविदा मागवित आहोत.
साईज : '८.५x११.२९' (ए ४) (२९x२१ सीएम)
एकूण नग : १५००

| अ.क्र. | तपशील | पेपर प्रत | संख्या | पेपर (दर) | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | कव्हर छपाईसह लॅमिनेशन | ३०० आर्ट पेपर डी.टी.पी. व डिझाईनसह | ०४ | | |
| २ | मॅटर छपाई | ७० GSM आर्ट पेपर एक बाजू पाठपोठ | ११४ | | |
| ३ | फोटो पेज | १३० GSM पाठपोठ | २० | | |
| ४ | विभाग पेज ब्लॅक ॲण्ड व्हाईट | १०० GSM आर्ट पेपर पाठपोठ | १६ | | |
| ५ | बायडिंग चार्जेस | साईड पिनिंग ॲण्ड कव्हर प्रिंटींग | | | |
| ६ | | | १५४ | एकूण | |
| ७ | | पर कॉपी रेट | | | |

सदर निविदा विहित नमुन्यात दिनांक ०४/१२/२०२३ ते ०८/१२/२०२३ पर्यंत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावी. निविदा उघडण्याच्या तारखेची माहिती संबंधित कंत्राटदारांना दिली जाईल.

**सही/-**
**प्राचार्य,**
**महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल**



### महाराष्ट्र शासन
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**
### निविदा सूचना क्रमांक ९२ सन २०२३-२०२४

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता.महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ – २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी–१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को–या निविदा नमुना **दिनांक ०४/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ११/१२/२०२३ रोजी १८.०० वाजे** पर्यंत **www.mahapwd.gov.in** या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक १२/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक १२/१२/२०२३ रोजी ११.०० वाजता** उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोजे चिंचवली ग्रा.पं. चिंचवली ता. माणगांव चिंचवली वाडी ते नवेनगर येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (डोंगरी) | १७४९८१ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | सां. बा. विभाग माणगांव येथील विश्राम गृहाची दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (२०५९) | ८४३५८० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | माणगांव एम ओ क्वार्टर ची विशेष दुरुस्ती करणे. तालुका माणगांव जिल्हा रायगड. (२२१६) | ९९९५३६ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | मौजे सुरव तर्फे तळे ता. माणगांव येथे सभामंडप बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि.) | ८४२८०३ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | तळा शहरातील एस.टी.बस स्थानक निवारा शेड बांधणे. सुशोभिकरण करणे. तसेच वाहतूक नियंत्रण कक्ष बांधणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि.) | ८४३८१९ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | माणगांव येथील सिव्हील जज क्वार्टरची विशेष दुरुस्ती करणे. (रंग काम, पाईप लाईन, ) तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (२२१६) | ७७५१११ | ८००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे अडावळे (बिऱ्हामण) आवाड येथे सभामंडप बांधणे. तालुका पोलादपुर, जिल्हा रायगड. (२५१५) | ४८९१७४ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ८ | मौजे खरवली ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि.) | ४२१८९६ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | उत्तरश्वार पाखाडी दिवेआगर येथे स्मशान शेड बांधणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (२५१५) | २४२६८८ | ३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग नऊ व वरील |
| १० | १)माणगांव येथील मा. जिल्हा न्यायाधीश निवासस्थानामधील ड्रेनेज व्यावस्थेची साफसफाई करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. २) माणगांव येथील मा.दिवाणी न्यायाधीश (क स्तार) निवासस्थानामध्ये ३००० लिटर पाण्याची टाकी बसविणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड, (२२१६) | ११७११५ | २००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग नऊ व वरील |
| ११ | मौजे पळसगांव खुर्द आदिवासीवाडी (ग्रा.पं.गंगवली) येथे सामाजिक सभागृह बांधणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड (आ. स्था.वि.) | ८०९५२४ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५४१०**
**दिनांक : ३०/१०/२०२३**
**विमाका/ कोवि/२०२३-२०२४/२३२**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**



### पनवेल महानगरपालिका
**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर,गोखले हॉलच्या शेजारी पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र/ पमपा/वै.आ.वि/२५९४/सन २०२३-२४ दिनांक: ०१/१२/२०२३

**EXPRESSION OF INTEREST (EOI)**
**MHD / EOI -1/2023**

**विषय** : पनवेल महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत नव्याने मंजुर झालेल्या व कार्यन्वित असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र व आपला दवाखाना येथील संशयित क्षयरुग्णांची एक्स-रे चाचणी (Digital) करणेकरिता स्वयंसेवी व खाजगी संस्थासोबत सामंजस्य करार करणेबाबत.

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सेक्टर ११ कंळबोली, काळुंद्रे / भिंगारी, कळंबोली गाव, पालेखुर्द, रोहिंजण, खांदा कॉलनी, कामोठे से. २२, शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र टेंभोडे, कोयनावळे, पडघे व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना खारघर सेक्टर १२ समाज मंदिर येथे प्रत्येकी - एक अशी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातुन पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरीब व गरजू व्यक्तींना प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच केंद्र व राज्य शासनातर्गत वैद्यकीय विषयक उपक्रम राबविले जातात, त्यामध्ये राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम राबविला जात आहे. यामध्ये प्रत्येक संशयित क्षयरुग्णांचे (सार्वजनिक / खाजगी सेंटरमध्ये) क्ष-किरण तपासणी करणे आवश्यक आहे. पनवेल महानगरपालिकेचे स्वतःच्या मालकीचे रुग्णालय अथवा डायग्नोस्टिक सेंटर (X-Ray Unit) उपलब्ध नसल्याने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातर्गंत संशयित क्षयरोगी रुग्णांच्या एक्स-रे चाचण्या करता येत नाहीत.

सबब, खालील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र व आपला दवाखाना या केंद्राकरिता Diagnostics Center अथवा Portable Machine द्वारे डिजीटल एक्स-रे चाचण्या सेवा उपलब्ध करून घेणे आहे.

| अनु. क्रं | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | केंद्राचा पत्ता |
|---|---|---|
| १ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-४ कळंबोली | सेक्टर ११, गुरुद्वारा समोर, कळंबोली, |
| २ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-७ काळुंद्रे / भिंगारी | जुने ग्रामपंचायत कार्यालय, मराठी शाळेसमोर, भिंगारी पनवेल |
| ३ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-८ कळंबोली गाव | कालभैरव सभागृहाजवळ, प्रभाग समिती क समोरील कार्यालय, कळंबोली |
| ४ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- ९ पालेखुर्द | जुने ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळेच्या बाजुला पालेखुर्द |
| ५ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र -१० रोहिंजण | जुने उपकेंद्र, श्री छत्रपती शिवाजी महाराज स्कुल च्या मागे, रोहिंजण |
| ६ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- ११ खांदा कॉलनी | गुरूदेव आरकेड, प्लाट नं ७, से, ९ खांदा कॉलनी |
| ७ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-१४ कामोठे से. २२ | प्रभु श्राइन को ऑप. सोसायटी प्लॉट नं ८५ से २२ , कामोठे |
| ८ | शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र टेंभोडे | ग्रामपंचायत कार्यालय |
| ९ | शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र कोयनावळे | समाजमंदिर |
| १० | शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र पड़घे | ग्रामपंचायत कार्यालय |
| ११ | हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना | खारघर सेक्टर- १२ समाजमंदिर |

स्वंयसेवी व खाजगी संस्था ( Diagnostics Center) हे त्याच केंद्राच्या कार्यक्षेत्रात असणे आवश्यक आहे. याकरिता निश्चित केलेल्या सेवा शर्ती खालीलप्रमाणे:

1) Only Service Provider is required to participate in this offer. This is essential to ensure alignment of interest of the Panvel Municipal Corporation & Service Provider. The firm will ensure that the required equipment uptime & service availability as desired by the Panvel Municipal Corporation, Panvel, Maharashtra (mentioned below) are met.
2) The Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel will have the right to accept or reject any tender fully or any part of it, without assigning any reason.
3) The bidder shall submit the following documents along with the EOI:
1. Name of the Director/Owner, Firm & Address and Phone no.
2. Documents of Registration/incorporation Certificate: (BARC Registration / Permission Letter)
4) The MOU will be made for 01 year.
5) TB patient's mobilisation/transportation of patients will be the responsibility of Patient and bidder will have to handover the report alongwith Film to Patient as well as to the UPHC in same day.
6) The firm will have to arrange / appoint duly qualified and trained personnel and also tools such as Tele radiology may be utilized to ensure proper and quick service to the patients.
7) The successful bidder shall not have right to sub - let assign the rights and obligations mentioned herein to any other third party, without the prior written approval from MEDICAL OFFICER OF HEALTH. In the event of the successful bidder transferring or assigning the same without prior approvals, the MEDICAL OFFICER OF HEALTH/PMC reserves the right to forthwith terminate the contract and take possession of the premises, equipment and patient and accounting records.
8) The firm will ensure upkeep and maintenance of the Diagnostic Service machinery so as to ensure uninterrupted functioning of the same. Bidder will commit to rectify technical and other snag within 48 hours.
9) In addition, the successful bidder will take care of the following expenses:
- All IT needs for Reporting,
- All consumables like films, contrast media, reagents, chemicals, etc.
- All administrative expenses associated with running of the machine/s.
- All expenses related to salaries and other remuneration to the staff of the bidder.
- Provider should located in UPHC Area.
- Work should be provided as per zone / uphc.
- Patient Refer by particular UPHC.
- Payment should be paid by PMC. Billing is submitted to same UPHC.
10) Machine sends out High frequency waves
11) The rate Rs. 200/- each Digital X-Ray along with film as per decieded by PMC.

उपरोक्त दराने डिजीटल एक्स-रे चाचण्या सेवा पुरविण्यास इच्छूक असलेल्या स्वंयसेवी व खाजगी संस्थांनी वरील सेवा शर्तींची पुर्तता करून दोन लिफाफे पध्दतीत (Technical and Commercial) होकारपत्र व दरपत्रक बंद पाकीटात दिनांक ११.१२.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वैद्यकिय आरोग्य विभाग, पनवेल महानगरपालिका, मुख्यालय, पनवेल येथे स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) सादर करावे.

**सही/-**
**(डॉ. आनंद गोसावी)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

### पनवेल महानगरपालिका

कामाचे नाव – पनवेल महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत नव्याने मंजुर झालेल्या व कार्यन्वित असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र व आपला दवाखाना येथील संशयित क्षयरुग्णांची एक्स-रे चाचणी (Digital) करणेकरिता स्वयंसेवी व खाजगी संस्थासोबत सामंजस्य करार करणेबाबत.

ना. प्रा. आ. केंद्र:- सेक्टर ११ कंळबोली ( ) काळुंद्रे / भिंगारी ( ) कळंबोली गाव ( ) पालेखुर्द ( ) रोहिंजण ( ) खांदा कॉलनी ( ) कामोठे से. २२ ( )
शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र :- टेंभोडे ( ) कोयनावळे ( ) पडघे ( )
हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना : खारघर सेक्टर १२ ( )
वरीलपैकी एकाला (✓) अशी खुण करावी.

**दरपत्रक**

| अनु. क्रं. | कामाचा तपशिल | दर (सर्व करासहित) |
|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय संशयित क्षयरुग्णांची Diagnostics Center or Portable Machine द्वारे डिजीटल एक्स-रे चाचणी करणे (प्रति ०१ डिजीटल एक्स-रे)<br>**पनवेल महानगरपालिकेने प्रति Digital X-ray with Report निश्चित केलेला दर** | **रु.२००/-** |

Accepted :

Name of the Institute :

Name of the Owner :

Sign and Seal :

# बेशिस्त वाहक, चालकांवर होणार कारवाई

## नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाचा इशारा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एनएमएमटीने प्रशासनाने नवी मुंबईकरांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी नवी मुंबई शहरासह इतर परिसरात बससेवा सुरू केली आहे, मात्र काही मार्गावर बसचालक व वाहकांकडून होणाऱ्या बेशिस्तपणाला आवर घालण्यासाठी परिवहन उपक्रमाकडून कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.



परिवहन उपक्रमाकडून एनएमएमटीच्या चालक-वाहकांना वारंवार प्रवाशांसोबत कसे वागावे, नियंत्रित गाडी कशी चालवावी याविषयी प्रशिक्षण दिले जाते. प्रवाशांशी उद्धट वर्तन करणारे वाहक, चालकांना सुधारण्याच्या सूचना दिल्या जातात, मात्र तरीदेखील काही वाहक, चालकांकडून नियमांचे पालन होत नसल्याने अशा बेशिस्त वाहक व चालकांना यापुढे परिवहन उपक्रमाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. याबाबत परिवहन उपक्रमाकडून परिपत्रक काढून नियमांचे पालन करण्याचे फर्मान सोडण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमातील आस्थापना, ठोक मानधन व रोजंदारीवर कार्यरत असलेले वाहक कर्तव्यावर कार्यरत असताना बसमध्ये पहिल्या आसनावर बसून चालकासोबत बोलत असतात, तसेच शहरी बसमध्ये वाहकास बसण्यासाठी आसन ठेवण्यात आलेले नाही, तरीही प्रवासी उभे असतानाही काही वाहक आसनावर बसलेले असतात. वाहकाने प्रवाशास आसन देणे आवश्यक असताना वाहक प्रवाशासोबत वाद घालतात, अशा प्रवाशांच्या तक्रारी येत आहेत.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमातील सर्व चालक आणि वाहकांना परिपत्रकाद्वारे विविध नियम पाळण्याचे आवाहन केले आहे. त्याचप्रमाणे या नियमांचे पालन न केल्यास कारवाई करण्याबाबतही सांगण्यात आले आहे.

> **प्रवाशांना बसमार्गाबाबत व थांब्याबाबत अचूक माहिती न देता बसमध्ये पहिल्या आसनावर बसून चालकासोबत बोलत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित वाहकावर कारवाई करण्यात येईल, तसेच मार्गावरील पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करताना असे निदर्शनास आल्यास संबंधित चालक आणि वाहकांविरूद्ध अहवाल सादर करावा लागेल.**
> **-उमाकांत जंगले,**
> **मुख्य वाहतूक अधिकारी**

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचा ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांसोबत करार

## लाभार्थ्यांना थेट विशेष सवलत मिळणार -नरेंद्र पाटील

**नवी मुंबई : बातमीदार**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या मराठा समाजातील नागरिकांना व्यावसायिक होण्यासाठी साहाय्य करणारे महामंडळ आहे. शेतकरी बांधवांसाठी संजीवनी ठरत असलेली महामंडळाची ट्रॅक्टर योजना महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी पुन्हा एकदा सुरू केली आहे. या योजनेच्या अनुषंगाने मंडळाने गुरुवारी (दि. ३०) विविध ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या वेळी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते (भा.प्र.से), उप महाव्यवस्थापक आकाश मोरे उपस्थित होते. या सामंजस्य करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना ट्रॅक्टर घेताना थेट विशेष सवलत मिळणार आहे.

मराठा प्रवर्गातील नागरिकांनी महामंडळाच्या वेबसाईटवर नोंदणी करावी. व्यवसायासाठी बँकेकडून कर्ज घ्यावे व कर्जावरील व्याज परतावा महामंडळ अदा करेल, असे योजनेचे स्वरूप आहे. ही ट्रॅक्टर योजना सुरू करताना महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची




ट्रॅक्टर योजना महायुती सरकारच्या माध्यमातून आम्ही पुन्हा एकदा सुरू करीत आहोत. सर्वप्रथम एस्कॉर्ट क्युबोटा लि. आणि महिंदा अँड महिंद्रा या ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांनी महामंडळाकडे प्रस्ताव सादर केले होते. त्या अनुषंगाने या ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांसोबत महामंडळाने सामंजस्य करार करण्यात आला. त्यानंतर स्वराज महिंद्रा, सोनालिका सोलीस, सीएनएच न्यू हॉलंड, टीएएफई, क्युबोटा, व्हीएसटी टीलर्स, इचर, कॅप्टन, जॉन डीरी, प्रित या ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांनी महामंडळाकडे लाभार्थ्यांना थेट विशेष सवलतीचे प्रस्ताव सादर केले. त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केलेल्या कंपन्यांसोबत गुरुवारी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

# व्यवसाय परवाना नूतनीकरण करण्याबाबत नमुंमपाचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७६, अनुसूची ड, प्रकरण १८, भाग ४मध्ये समाविष्ट असलेले खानावळी, हॉटेल, उपहारगृहे, लॉजिंग बोर्डींग, स्वीट मार्ट, केक शॉप, आईस्क्रिम पार्लर, केश कर्तनालये, ब्युटी पार्लर इत्यादी सर्व व्यवसाय यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७६ अन्वये देण्यात आलेल्या व्यवसाय परवान्यांचे नुतनीकरण दरवर्षी करण्यात येते.

नवी मुंबई महापालिकेमार्फत त्यांचे नूतनीकरण करण्याची प्रक्रिया तसेच व्यावसायिकांना परवाना देण्याची प्रणाली पारदर्शी व सुलभ करण्याकरिता तसेच विनासायास गतीमानतेने होण्याकरिता ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्या अनुषंगाने ज्या व्यावसायिकांनी नवी मुंबई महानगरपालिकेकडून कलम ३७६ अन्वये व्यवसाय परवाना घेतलेला आहे आणि ज्या व्यावसायिकांनी घेतलेल्या व्यवसाय परवान्याची कालमर्यादा संपुष्टात आलेली आहे, अशा सर्व व्यावसायिकांनी व्यवसाय परवाना नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

व्यवसाय परवाना नूतनीकरण २०२४साठी संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह www.rtsnmmconline.com किंवा नवी मुंबई मनपाचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in वरील सुविधेचा वापर करून ३१ डिसेंबरपूर्वी ऑनलाईन अर्ज स्वतः सादर करावेत. विहित कालमर्यादेत परवान्याचे नुतनीकरण केले नाही तर परवाना धारकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३९२, ४६८अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. व्यवसाय परवाना नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७६ अनुसार ऑनलाईन पद्धतीनेच परवाना नूतनीकरणाची कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी. कारवाई टाळण्यासाठी व्यावसायिकांनी त्वरित परवाना नूतनीकरण करून घ्यावे, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# मनोज ठाकूर यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**उरण** : फार्मसिस्ट दिनानिमित्त सामाजिक आणि फार्मसी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचाराज्य फार्मसी कौन्सिलनतर्फे सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराच्या पहिल्याच वर्षाचे मानकरी उरणमधील ओमसाई मेडिकल स्टोअरचे मालक मनोज ठाकूर ठरले आहेत.

गेल्या १८ वर्षांपासून त्यांनी वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून केलेल्या कार्याची नोंद प्रशासनाने घेतली आहे. नागरिकांना औषधंबाबत माहिती देणे, आदिवासी बांधवांसाठी वैद्यकीय उपचार शिबिरे घेणे यांसारखी अनेक कामे ठाकूर यांनी केली आहेत. ते रायगड जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


# पतीच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## आरोपी पतीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीत राहणाऱ्या एका २५ वर्षीय विवाहितेने पतीच्या मानसिक व शारीरिक जाचाला कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील मृत विवाहितेचा पती प्रवीण माधवराव चिता (वय २८) याच्याविरोधात हुंडाबळीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी प्रवीण चिता हा मूळचा आंध्र प्रदेशातील असून, सध्या तो कळंबोली सेक्टर ५ ईमध्ये राहण्यास आहे. क्रेन ऑपरेटर म्हणून काम करणाऱ्या प्रवीण चिता याचा विवाह मे २०१९मध्ये ठाण्यात राहणाऱ्या रविना हिच्यासोबत झाला होता.




प्रवीण व रविना या दोघांचा संसार दोन वर्षे सुरळीत चालला, मात्र फेब्रुवारी २०२१नंतर प्रवीणला दारुचे व्यसन जडल्यानंतर त्याने रविनाला त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळे रविनाचा भाऊ सचिन लयशेट्टी याने तिला ठाणे येथील आपल्या घरी नेले होते. त्या वेळी प्रवीणने रविनाच्या कुटुंबियांची माफी मागून तिला पुन्हा कळंबोली येथे घरी नेले होते.

काही दिवसांनंतर प्रवीणने रविनाच्या चारित्र्यावर संशय घेऊन तसेच तिने माहेरून पैसे आणावेत म्हणून तिला मारहाण व शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळे रविनाला भाऊ सचिन याने १० हजार रुपये दिले होते. त्यानंतरदेखील सचिनने प्रवीणच्या मागणीनुसार रविनाकडे पाच ते १० हजार रुपये दिले होते. प्रवीणमध्ये सुधारणा होईल, या आशेने रविनाचे कुटुंबीय तिला पुन्हा प्रवीणच्या घरी पाठवत होते, मात्र त्यानंतरदेखील प्रवीणकडून रविनाचा मानसिक व शारीरिक छळ सुरूच राहिला. त्यामुळे रविनाच्या नातेवाईकांनी व प्रवीणच्या नातेवाईकांनी त्याला प्रत्यक्ष भेटवून रविनाला त्रास न देण्याबाबत विनंती केली होती. मंगळवारी (दि. २८) सकाळी पुन्हा प्रवीणने रविनाला मारहाण सुरू केल्यानंतर तिने आपल्या भावाला फोन करून त्याबाबत माहिती दिली. त्यामुळे रविनाचा भाऊ व त्याचे चुलते कळंबोली येथे गेले. त्यांनी व प्रवीणचा चुलत भाऊ या सर्वांनी प्रवीणला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने त्यांच्यासमोरदेखील शिवीगाळ सुरू केली. त्यामुळे सचिन व त्याचे चुलते पनवेल येथे कामानिमित्त निघून गेले.

प्रवीणकडून होत असलेला शारीरिक व मानसिक छळ असह्य झाल्याने रविनाने त्याच दिवशी राहत्या घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. या आत्महत्येनंतर रविनाचा भाऊ सचिन लयशेट्टी याने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## निवडक

### नाट्य स्पर्धेत ‘कपट्यम’चे सादरीकरण

**उरण** : महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित ६२वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धा डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ठाणे येथे मंगळवारपासून सुरू झाली आहे. या स्पर्धेमध्ये तालुक्यातील भेंडखळ गावातील श्री जरी मरीआई नवरात्रौत्सव मंडळ प्रस्तुत, फ्रेंड्स सामाजिक कलामंच भेंडखळ आयोजित ‘कपट्यम’हे दोन अंकी नाटक बुधवारी (दि. ६) दुपारी १२:३० वाजता सादर होणार आहे. नाटकाचे लेखक किरण घरत असून दिग्दर्शक चंद्रविलास घरत यांनी केले आहे. नाटकात रेखा ठाकूर, निकिता पाटील, संकेत ठाकूर,राजेश ठाकूर, भावेश ठाकूर, कौशिक म्हात्रे, उमंग भोईर, चंद्रविलास घरत आणि किरण घरत आदी कलाकार आहेत.

### मुख्याध्यापिका प्रगती दलाल सेवानिवृत्त

**पनवेल** : कोएसो. के. वी. कन्याविद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रगती दलाल यांचा सेवापूर्ती समारंभ विद्यालयात झाला. दलाल यांनी १९८८ ते १९९१ या काळात के. वी. कन्याशाळेमध्ये सेवा केली. त्यानंतर त्या १९९१ ते २००० सालापर्यंत कोएसोमध्ये कार्यरत होत्या. १ जानेवारी २०२३पासून त्यांना प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून पदोन्नती मिळाली. या वेळी माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, माधुरी गोसावी, प्रीती जॉर्ज म्हात्रे, डॉ. सुरेखा मोहकर आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.

### रिक्षात विसरलेला मोबाईल केला परत

**पनवेल** : तालुक्यातील दिघाटी गावचे रिक्षाचालक ऋषिकेश पाटील यांनी त्यांना सापडलेला मोबाईल मूळ मालकास परत केला. खारघरमध्ये रिक्षा चालवत असताना आपल्या रिक्षातून महिला प्रवासी खारघर सेक्टर २मधून रिक्षातून प्रवास करताना आपला मोबाईल त्यांच्या रिक्षातच विसरून गेल्या. रिक्षाचालकाने तो जवळील खारघर वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार जालिंदर कोल्हे यांच्या ताब्यात दिला. थोड्या वेळाने त्यांना त्याच मोबाईलवर एक फोन आला व मोबाईलचा मूळ मालक असलेल्या खारघर सेक्टर २ येथे राहणाऱ्या सुलेखा चव्हाण यांनी आपलाच मोबाईल असल्याचे सांगितले.

### आगरी कोळी द्रोणागिरी महोत्सव

**उरण** : शांतेश्वरी आई सामाजिक संस्था नवीन शेवातर्फे २ ते १० डिसेंबरदरम्यान सायंकाळी ६:३० ते रात्री १० वा. पर्यंत शांतेश्वरी मैदान, शिवराय चौक, नवीन शेवा, द्रोणागिरी येथे आगरी कोळी द्रोणागिरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध स्पर्धा, कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या आगरी कोळी द्रोणागिरी महोत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन आई शांतेश्वरी सामाजिक संस्था नवीन शेवा उरणच्या वतीने करण्यात आले आहे.

# मनपाच्या सर्व लोकसेवा ऑनलाईन करा

## नवी मुंबई आयुक्तांचे अधिकारीवर्गाला बैठकीत निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवांपैकी २८ लोकसेवा ऑनलाईन दिल्या जात असून उर्वरित सेवाही ऑनलाईन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व याबाबतचे सादरीकरण विभागप्रमुखांच्या पुढील बैठकीत सादर करावेत, असे निर्देश आयुक्त राजेश नार्वेकर यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत दिले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.




या बैठकीमध्ये आयुक्तांनी विविध विभागांमार्फत सुरू असलेल्या तसेच नियोजित कामांचा सविस्तर आढावा घेतला. यामध्ये लिडार सर्वेक्षण कामाला गती देऊन हे काम तत्परतेने करणेबाबत आखणी करावी, असे निर्देश दिले. त्यालाच समांतरपणे मालमत्ताकर विभागाने प्रत्यक्ष सर्वेक्षण करून पडताळणी करावी असेही आयुक्तांनी सूचित केले.

नवी मुंबई पालिकेच्या बांधून तयार असलेल्या इमारती वापरात आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देशित करीत मालमत्ता विभागाने संबंधित विभागांकडे अशा मालमत्तांबाबतची माहिती देऊन तसेच अभियांत्रिकी विभागांशी समन्वय साधून इमारती बांधलेल्या प्रयोजनासाठी कार्यान्वित होतील याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले. यापैकी काही इमारतींना स्वत: भेटी देऊन पाहणी करणार असल्याचे आयुक्तंनी स्पष्ट केले.

यामध्ये बांधून तयार असलेली मार्केट्स वापरात आणण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी मार्केट इमारतींचा विभागनिहाय आढावा घेतला व नोंदणीकृत फेरीवाले मार्केटमध्ये बसून व्यवसाय करतील यादृष्टीने प्रभावी प्रयत्न करावेत असे सूचित केले. त्याचप्रमाणे घणसोली येथील रात्र निवारा केंद्र, सीवूड्स येथील पाळणाघर तसेच ज्येष्ठ नागरिक काळजी केंद्र लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देशित केले.

याशिवाय इतर विभागांमध्ये सुरू असलेल्या कामांचा व सेवांचा सविस्तर आढावा घेत आयुक्त राजेश नार्वेकर यांनी विभागप्रमुखांच्या पुढील बैठकीत आज दिलेल्या सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देशित केले.

# केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेसाठी मुदतवाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परीक्षा, पुणे यांच्या अधिसूचनेनुसार केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा-२०२३ या परीक्षेचे आयोजन जून २०२३च्या शेवटच्या आठवड्यामध्ये घेण्याचे नियोजित होते, परंतु उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी विविध याचिका दाखल झालेल्या होत्या. त्यामुळे आता सर्व जिल्हा परिषदेमधील प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा ऑनलाईन होणार असून परीक्षेचा दिनांक संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन प्रणालीद्वारे www.mscepune.in या संकेतस्थळावर ८ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन आवेदनपत्र व शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. यापूवी सर्व पात्रतेसह यशस्वीरित्या ऑनलाईन पद्धतीने योग्य शुल्कासह आवेदनपत्र भरलेल्या उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही, तसेच ज्या उमेदवारांनी ईमेलद्वारे माहिती पाठवून परीक्षा शुल्काचा भरणा केला आहे, अशा उमेदवारांचे पडताळणी करून त्यांच्या बँकखाते क्रमांकावर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सदरील परीक्षा शुल्क यथावकाश परत करण्यात येईल.

उमेदवारांनी पुनश्च ऑनलाईन आवेदनपत्र मुदतीत भरणे बंधनकारक राहिल, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे विभागाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेंडसे यांनी केले आहे.

# आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धेत ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांचे सुयश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर कॉमर्स आणि सायन्स कॉलेज खारघर येथे गुरुवारी (दि. ३०) जनार्दन आत्माराम भगत यांच्या जयंतीनिमित्त आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेत चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेलच्या नेहाकुमारी शहा आणि सिमरन पटेल बारावी (संयुक्त) यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर ज्योत्स्ना दुर्गे आणि आरती गुप्ता बारावी सायन्स या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक पटकाविला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांनी अभिनंदन केले.





**कामोठे : नगरसेवक चषक स्पर्धेच्या उद्घाटनाच्या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक विजय चिपळेकर यांनी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे स्व. दि. बा. पाटील मैदानामध्ये हायमास्ट दिवे लावण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन पमपाचे विद्युत विभागाचे अधिकारी भूषण नाईक यांनी मैदानाची पाहणी करून हायमास्ट बसविण्याचे आदेश दिले. या वेळी बंटी भोईर, सागर पाटील, संदेश चिपळेकर, अनिकेत चिपळेकर, सोनू पाटील आदी उपस्थित होते.**

# राष्ट्रवादीला राष्ट्रीय दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न करणार

## प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन

**कर्जत : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसला आपला गमावलेला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळवून देण्यासाठी आम्ही पक्ष संघटना वाढवून मिळविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

कर्जत येथील राष्ट्रवादीच्या घड्याळ तेच, वेळ नवी या दोन दिवसीय वैचारिक शिबिरात पहिल्या दिवसाचा समारोप पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार तटकरे यांच्या पत्रकार परिषदेने गुरुवारी (दि.३०) झाला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी ब्रीज भवन सिंग अविनाश आदिक, प्रवक्ते संजय तटकरे, माजी खासदार आनंद परांजपे आदी उपस्थित होते.



(छाया : सलीम शेख)

या वेळी पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत सहभागी झाल्यानंतर आम्ही राज्यात नव्या उत्साहाने निघालो आहोत, असे सांगून प्रदेशाध्यक्ष खासदार तटकरे म्हणाले की, अजितदादांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवणारे विधानसभा, विधान परिषद सदस्य सर्व जिल्हा अध्यक्ष, महिला जिल्हा अध्यक्ष, युवक जिल्हा अध्यक्ष यांची येथे उपस्थिती असल्याचे सांगून वक्ते म्हणून उदय निरगुडकर, संजय मिश्किल, मंदार फणसे, अमेय तिरोडकर यांच्यासह प्रा. सुनील मक्रे, सुरज चव्हाण, अमोल मिटकरी, विधासभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, रूपाली पाटील यांनी मार्गदर्शन केले.

**महायुतीचे जागावाटप डिसेंबरमध्ये**

**डिसेंबरमध्ये आम्ही महायुती म्हणून एकत्रित बसणार असून त्या ठिकाणी आम्ही राज्य काबीज करण्यासाठी एकत्र येऊन यशस्वी होऊ, असा विश्वास राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी या वेळी व्यक्त केला.**

उद्याच्या आव्हानाला सामोरे जात असताना राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी घेतलेला निर्णय धर्मनिरपेक्ष पक्ष म्हणून आमची विचारधारा कायम ठेवून सत्तेत सहभागी झालो आहोत. या शिबिरात महानिय वक्त्यांनीदेखील वेगवगेळ्या राजकीय घटनांचे दाखले देत अजित पवार यांनी घेतलेला निर्णय किती योग्य आहे हे दाखवून दिले आहे. तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या माध्यमातून केलेले काम, शेतीचे नुकसान यावर आम्ही केंद्रित केले आहे. त्याबद्दल देखील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. या वेळी केंद्रीय निवडणूक आयोगातील सुनावणीवर विचारविनिमय झाले आणि भविष्यात पक्ष आणि निशाण आमच्याकडे राहिल, असेही ते म्हणाले.

या वेळी राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते, प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# माणगाव टिएमसी कॉलेजमध्ये युवा मतदार नोंदणी शिबिर



**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये गुरुवारी (दि. ३०) युवा मतदार नोंदणी शिबिर झाले.

शिबिराच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर नायब तहसीलदार अरविंद घेमुड यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी का आवश्यक आहे तसेच आपल्या मतदानाचा अधिकार किती महत्त्वपूर्ण आहे याविषयी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे अध्यक्ष जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत यांनीदेखील आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना मतदानाचा हक्क बजावण्याविषयी आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पाटील यांनी महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने मतदार नोंदणी करणे का आवश्यक आहे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या उपक्रमावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य पुराणिक, मंडळ अधिकारी अर्जुन जमखंडी, तलाठी प्रियंका सतेरे हेही उपस्थित होते.

प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. चंद्रकांत माळी यांनी केले, तर आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हर्षल जोशी यांनी मानले.

महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षे पूर्ण होत आहे अशा विद्यार्थ्यांना या वेळी नव मतदार नोंदणी फॉर्मचे वाटप करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांकडून नोंदणी फॉर्म भरून घेण्यात आले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. ए. पी. मोरे, ग्रंथपाल अमित बाकडे, सौ. मांडवकर, सौ.सायगावकर आणि शिक्षकेतर कर्मचारीवृंद व विद्यार्थी यांचे उत्तम सहकार्य लाभले.

# एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त फ्लॅश मॉब, पोस्टर प्रदर्शन

## नागोठण्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उपक्रम



(छाया : श्यामकांत नेरपगार)

**नागोठणे : बातमीदार**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १ डिसेंबर या आतंरराष्ट्रीय एड्स प्रतिबंधक दिनानिमित्ताने फ्लॅश मॉबचे आयोजन नागोठणे येथील ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आले होते. त्याचप्रमाणे महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले.

४० ते ५० राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक हातात एड्स जनजागृती फलक घेऊन घोषणा देत होते. बाजारपेठेतील व रस्त्यावरील लोकांचे त्यांनी लक्ष वेधले होते. यानंतर सर्व विद्यार्थी महाविद्यालयात आले व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले गेले. रोहा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन या छान उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

हा संपूर्ण उपक्रम प्रभारी प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे व डॉ. विकास शिंदे यांनी राबवला. यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी कुणाल खांडेकर, स्वरूप केंद्रे, अनुष्का तांबोळी, साहिल घरत, पियुष बांदल, सायली मोरे, प्रज्वल बोटे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.




## राम करण यादव महाव्यवस्थापकपदी

**रोहे : प्रतिनिधी**



राम करण यादव यांनी मध्य रेल्वेचे नवे महाव्यवस्थापक म्हणून १ नोव्हेंबरपासून पदभार स्वीकारला आहे. ते १९८६च्या परीक्षा बॅचचे इंडियन रेल्वे सर्व्हिस ऑफ इंजिनियर्सचे वरिष्ठ अधिकारी आहेत. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी ते इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग, पुणे येथे महासंचालक म्हणून कार्यरत होते. ते नरेश लालवानी यांच्यानंतर आले.

# रेल्वे प्रवाशांसाठी नाईट कोर्ट मोहीम

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे नियमांची अंमलबजावणी आणि प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या हेतूने संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांना रोखण्यासाठी नाईट कोर्ट मोहीम राबविण्यात येत आहे. रेल्वे संरक्षण दल, मुंबई विभागातर्फे ही मोहीम आहे.

मध्य रेल्वेच्या कल्याण, टिटवाळा, बदलापूर, पनवेल, ठाणे, मुंब्रा, दिवा आणि डोंबिवली येथील रेल्वे संरक्षण कर्मचाऱ्यांनी कार्यक्षमतेने राबविलेल्या या मोहिमेने प्रशंसनीय कामगिरी केली.

आरक्षित डब्यांमध्ये अनधिकृतपणे प्रवेश केल्याबद्दल कलम १५५ भारतीय रेल्वे कायदा अंतर्गत १९७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. कलम १४७नुसार रेल्वे परिसरात घुसखोरी केल्याप्रकरणी ९९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेल्वे परिसरात अनधिकृतपणे फेरी मारणे आणि भीक मागणे यासाठी कलम १४४ भारतीय रेल्वे कायदा अंतर्गत १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय रेल्वे कायदा कलम १५९ अन्वये कायदा किंवा रेल्वे सेवकाच्या निर्देशांचे उल्लंघन केल्याबद्दल १ व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम १४५ भारतीय रेल्वे कायदा अंतर्गत रेल्वे परिसरात मद्यपान करून उपद्रव निर्माण केल्याप्रकरणी एक व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आले. विभागीय रेल्वे दंडाधिकारी, कल्याण यांच्या रात्र न्यायालयात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे एकूण ३११ व्यक्तींवर खटला चालवला गेला, ज्यामधून एकूण ४६ हजार ९५० रुपये वसूल केले असून सर्व दंड तातडीने भरण्यात आले.

रेल्वे प्रोटेक्शन फोर्सच्या समर्पित प्रयत्नांनी चालवलेली ही मोहीम संध्याकाळी गर्दीच्या वेळी प्रवाशांना नियमांचे उल्लंघन करण्यापासून परावृत्त करणे आणि शेवटी प्रवाशी सुरक्षितता वाढवणे आणि रेल्वे यंत्रणेतील नियमांचे पालन करणे हा आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईटची वाहतूक

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यात पुन्हा एकदा बॉक्साईट उत्खनन सुरू झाले आहे. बॉक्साईटच्या खाणी पुन्हा एकदा सक्रिय झाल्या असून प्रतिदिन हजारो टन बॉक्साईटची वाहतूक सुरू झालेली आहे, मात्र ज्या डंपर्स मधून बॉक्साईटची वाहतूक केली जाते त्यांची क्षमता २० ते २२ टन एवढी असताना त्यामध्ये ३० ते ३५ टन बॉक्साईट भरण्यात येते. पोलीस व प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांनी क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईट वाहतूक करणाऱ्या डम्परवर लवकरात लवकर कारवाई करावी, अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.




(छाया : संतोष चौकर)

हे बॉक्साईट घोणसे घाट चढून गेल्यानंतर एका जागेवर डम्प करण्यात येते व त्या ठिकाणाहून कर्नाटक राज्यातील डम्पर्स येऊन बॉक्साईट पुढे घेऊन जातात.

श्रीवर्धन-हरिहरेश्वर हा डांबरीकरण केलेला रोड असून या रोडची क्षमता १५ ते २० टन वाहतूक करता येईल एवढीच आहे, पण या रस्त्यावरून जवळजवळ ३५ टन भरलेले डम्पर ये-जात करीत असल्यामुळे हा रस्ता लवकरच उखडून जाईल असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.


श्रीवर्धन तालुक्यात हजारो पर्यटक रोज पर्यटनासाठी येत असतात. यासाठी या ठिकाणचे रस्ते चांगले असणे आवश्यक आहे, पण क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईट भरून या मार्गावरून वाहतूक सुरू राहिल्यास श्रीवर्धन-हरेश्वर मार्ग, त्याचप्रमाणे म्हसळा-श्रीवर्धन मार्ग लवकर खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवासी आणि वाहनचालकांना नाहक त्रास होईल.

क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईट भरलेले डम्पर्स श्रीवर्धन-हरेश्वर मार्ग त्याचप्रमाणे श्रीवर्धन-म्हसळा मार्गावरून सुसाट वेगाने जात असल्याचे अनेक वेळा पाहायला मिळते. फक्त घाट रस्ता आल्यानंतर यांचा वेग कमी झालेला पहायला मिळतो.

प्रादेशिक परिवहन विभाग त्याचप्रमाणे पोलिसांकडून या क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक करणाऱ्या डम्पर्सवर कायदेशीर कारवाई का करण्यात येत नाही, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. तसे केल्यास अशा वाहतुकीस जरब बसून शासनाला चांगला महसूल मिळू शकतो. त्यातून शासनाच्या तिजोरीत भर पडेल.

पोलीस व प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांनी क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईट वाहतूक करणाऱ्या डम्परवर लवकरात लवकर कारवाई करावी, अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# मुठवली गावात शक्ती-तुरा नाचाचे सामने रंगले



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मुठवली गावात शक्ती तुरा नाचाच्या जंगी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शक्तीवाले भानुदास घराण्यातील राम विश्वास यांचे शिष्य शाहीर चंद्रकांत कदम (रा. कुमशेत) आणि तुरेवाला ताडदेव घराण्यातील गुरुवर्य अनंत शांताराम यांचे शिष्य शाहीर काशीराम वाढवळ (रा. कालवण) यांचा नाचाचा जंगी सामना रंगला.

नाचाचे सामने पाहण्यासाठी मुठवली, कालवण, दाखणे या पंचक्रोशीतील असंख्य लोकांनी उपस्थित राहून शाहिरांच्या कलेचा आनंद लुटला.

कोकणात गौरी गणपतीत तसेच इतर कार्यक्रमात नाच, तमाशा, बैठकीच्या लावण्या, संगीत भजन, भारूड यांसारखे कार्यक्रम नेहमी आयोजित करून कोकणातील स्थानिक कलाकार आपल्या या विविध कार्यक्रमांद्वारे आपली कला सादर करीत असतात. कोकणात लोककलेला फार महत्त्व असून त्यातून अनेक कलावंत घडले आहेत.

कार्यक्रमास शिवराम वाढवळ, अशोक जाधव, गणपत सत्वे, अनंत वाढवळ, गंगाराम मोरे, वामन पवार, गणेश पारात्पे, दिलीप नवगणे, महेश वाढवळ, संजय वाढवळ इत्यादी मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कायस्थ संस्थेतर्फे एकवीरा आई पालखी सोहळा

**रोहे : प्रतिनिधी**

चांद्रसेनिय कायस्थ प्रभू संस्था आणि चांद्रसेनिय कायस्थ प्रभू उत्कर्ष संस्था यांच्याबरोबर सहआयोजक म्हणून सहभागी झालेल्या पुण्यातील पुणे सीकेपी फॅमिली पब्लिक ट्रस्ट व चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाज संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षीचा एक दिवस कायस्थांचा एकवीरा देवीचा पालखी सोहळा नुकताच कार्ला गडावर व गडाच्या पायथ्याशी असलेल्या स्वप्नपूर्ती बंगला येथे मोठ्या उत्साहात झाला. या सोहळ्यास असंख्य ज्ञाती बांधवांनी हजेरी लावली.



पहाटेच्या अभिषेकापासून सुरू झालेला हा सोहळा पुढे होमहवन, पालखी, गोंधळ, आरती व त्यानंतर महाप्रसाद या रूपरेषेनुसार निर्विघ्नपणे पार पडला. ज्ञाती बांधव एकत्र येऊन संपर्क, सहवास आणि समन्वय असा त्रिवेणी संगम झालेला पहावयास मिळाला, ज्यामुळे एक दिवस आणि रात्र एकत्र येऊन जणू कायस्थांच्या संमेलनाचे स्वरूप या कार्यक्रमास प्राप्त झाले व ज्या उद्देशाने ही रूपरेषा आखली तो सफल झाल्याचे समाधान मिळाले.

या कार्यक्रमाकरिता नेमलेल्या समित्या व त्यातील सदस्यांनी कामे चोखपणे आणि तेवढ्याच उत्साहाने पार पाडली. संयोजन समितीत प्रामुख्याने, स्वप्नील प्रधान, जयदीप कोर्डे, माणिक गडकरी, गजेंद्र गडकरी, मिलिंद मथुरे, वृंदा मथुरे, सागरिका व संजोग कर्णिक, पुष्कर गुप्ते, संजना गुप्ते, भूषण देशपांडे, मंदार कुळकर्णी, नीलेश गुप्ते, चिन्मय चौबळ, सुविज्ञ गुप्ते, प्रतिक मथुरे, पायल मथुरे, विवेक पाटणकर, संकेत कर्णिक, प्रकाश गुप्ते, नताशा कारखानीस, गौरी मथुरे, ईशा दिघे, अशोक कुळकर्णी, प्रसाद मथुरे, भूषण देशपांडे, नागेश देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, अशी माहिती सीकेपी उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष विकास देशमुख यांनी दिली.

# पुजारा-रहाणेची कारकीर्द संपुष्टात?

## दक्षिण आफ्रिका दौऱ्यातून वगळले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या दौऱ्यासाठी निवडकर्त्यांनी अनेक आश्चर्यकारक निर्णय घेतले. भारताच्या कसोटी संघातून अजिंक्य रहाणेला संघातून वगळण्यात आले, तर चेतेश्वर पुजारालादेखील डच्चू देण्यात आला आहे. त्यामुळे या दोघांची कारकीर्द संपल्याची चर्चा आहे.

निवड समितीने तीन फॉरमॅटसाठी तीन वेगवेगळ्या कर्णधारांची नियुक्ती केली. सूर्यकुमार टी-२०मध्ये कर्णधारपद भूषवताना दिसणार आहे. के. एल. राहुल एकदिवसीय सामन्यात आणि रोहित शर्मा कसोटीत नेतृत्व सांभाळणार आहे.

टी-२०मध्ये बहुतेक खेळाडू असे आहेत जे सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत खेळत आहेत. त्या संघात फक्त रवींद्र जडेजाचा समावेश करण्यात आला आहे. त्याचवेळी एकदिवसीय संघ पूर्णपणे बदलला आहे आणि त्या संघात फक्त तीन खेळाडू (श्रेयस अय्यर, राहुल आणि कुलदीप) आहेत जे एकदिवसीय विश्वचषक २०२३ खेळले आहेत. सलामीवीरांपासून गोलंदाजांपर्यंत पूर्णपणे नवीन संघ आहे. त्याचबरोबर कसोटी संघात फारसा बदल झालेला नाही, पण अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारा संघात नाही.



### वनडे, टी-२०मध्ये रोहित, विराटला विश्रांती

रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोन वरिष्ठ खेळाडू दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय आणि टी-२० संघात नसतील. सध्या चालू असलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेतून या दोन खेळाडूंनी विश्रांती घेतली आहे. याबाबत बीसीसीआयने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, रोहित आणि विराटने मर्यादित षटकांच्या खेळातून विश्रांती देण्याची विनंती केली होती. त्यानुसार या दोन्ही खेळाडूंचा एकदिवसीय आणि टी-२० संघात समावेश केलेला नाही, तर मोहम्मद शमीच्या दुखापतीवर उपचार सुरू आहेत. त्यामुळे त्याचा संघातील समावेश हा त्याच्या फिटनेसवर अवलंबून आहे.

रोहित आणि विराट २०२२च्या टी-२० विश्वचषकापासून टी-२० क्रिकेट खेळलेले नाहीत. तेव्हापासून हार्दिक पांड्या भारताचा टी-२० कर्णधार आहे, पण त्याच्या दुखापतीमुळे सूर्यकुमार यादव ऑस्ट्रेलियाविरुद्ध कर्णधार आहे.



## ॲथलेटिक्स स्पर्धेत घनश्याम म्हशीलकर यांचे सुयश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था या ठिकाणी दुसरी खेलो मास्टर राज्यस्तरीय ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड पाताळगंगा कंपनीतर्फे रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारे रीस कांबे येथील रहिवासी घनश्याम श्रीकृष्ण म्हशीलकर यांनी विविध पदके पटकाविले.

या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. म्हशीलकर यांनी ५० वर्षांवरील गटात लांब उडीत सुवर्णपदक, तिहेरी उडीत सुवर्णपदक, थाळीफेकमध्ये कांस्यपदक मिळवून रसायनीसह रायगडचे नाव उंचावले आहे.

या वेळी खेलो मास्टर राज्यस्तरीय ॲथलेटिक्स असोसिएशनचे सेक्रेटरी अमन चौधरी, खासदार नवनीत राणा, स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते घनश्याम म्हशीलकर यांना पदके देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल म्हशीलकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## दिव्या गायकवाडची राष्ट्रीय खो-खो संघात निवड



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय आणि नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने काटोल येथे नुकतीच १९ वर्षांतील शालेय राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा झाली. या स्पर्धेत चमकदार कामगिरी करणारी एसएसटी कॉलेजची तसेच कोपरखैरणे येथील ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशनची खेळाडू दिव्या सदानंद गायकवाड हिची महाराष्ट्राच्या संघात निवड करण्यात आली.

राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेतून १२ ते १६ डिसेंबरदरम्यान नाशिक येथे होणाऱ्या आंतरशालेय राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला गेला. या संघात दिव्या गायकवाड हिची महाराष्ट्राच्या संघात निवड झाल्याने तिचे अभिनंदन होत आहे.

## खो-खो, कबड्डी राज्यस्तरीय स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

महर्षी दयानंद महाविद्यालयाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही कनिष्ठ आणि ज्येष्ठ आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या आवारातील भव्य पटांगणावर ४ ते ६ डिसेंबरदरम्यान खो-खो, तर ७ ते ९ डिसेंबर या कालावधीत कबड्डी स्पर्धा रंगणार आहे.

या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या इच्छुक महाविद्यालयाने आपला प्रवेश अर्ज महर्षी दयानंदच्या क्रीडा विभागाकडून स्वीकृत करून तो पूर्ण भरून आपल्या प्राचार्यांच्या सही शिक्क्यानिशी २ डिसेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत मनोज पाटील किंवा निकिता पवार यांच्याकडे क्रीडा विभागात सपूर्द करावा, असे आवाहन पत्रकाद्वारे महर्षी दयानंद महाविद्यालयाच्या वतीने सर्व महाविद्यालयांना करण्यात आले आहे.



**पनवेल : येथील किंजल स्पोर्ट्सच्या वतीने आदर्श ट्रॉफी २०२३ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नवीन पनवेल येथील स्व.राजीव गांधी मैदानावर करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. आयोजकांच्या वतीने तेजस म्हात्रे आणि विशाल जितेकर यांनी त्यांचे स्वागत केले. या स्पर्धेत एकूण ५४ संघांनी सहभाग घेतला असून स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणून महिलांचे संघही खेळणार आहेत. एकूण पाच लाख रुपयांची बक्षिसे विजेत्यांना देण्यात येणार आहेत. या वेळी परेश ठाकूर यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना गौरविण्यात आले.**



## धोनी सर्वोत्कृष्ट कर्णधार, तर रोहित उत्कृष्ट व्यक्ती!

**चेन्नई : वृत्तसंस्था**

संपूर्ण विश्वचषकात १० सामने जिंकूनही अंतिम टप्प्यात भारताला बहुप्रतीक्षित विश्वविजेतेपद जिंकता आले नाही. या संदर्भात बोलताना भारतीय क्रिकेटपटू आर. अश्विनने संघाची पाठराखण केली आहे. त्याचप्रमाणे महेंद्रसिंह धोनी हा सर्वोत्तम कर्णधारांपैकी एक आहे. तसाच रोहित शर्मा एक उत्कृष्ट व्यक्ती आहे, असे अश्विनने म्हटले आहे.

### अश्विनचे मत

या विश्वचषकात संघातील वातावरण कसे होते यावर अश्विनने अलीकडेच एका मुलाखतीत भाष्य केले आहे. एस. बद्रीनाथ यांच्या यूट्यूब चॅनलवर बोलताना अश्विनने अंतिम पराभवानंतरच्या काही दुःखद क्षणांविषयी भाष्य केले. तत्पूर्वी त्याने कोहली व रोहित शर्मा दोघांचेही तोंडभरून कौतुक केले. रोहितच्या कर्णधार म्हणून संघातील भूमिकेवर अश्विन म्हणाला की, तुम्ही भारतीय क्रिकेटकडे पाहिल्यास प्रत्येकजण तुम्हाला सांगेल की, एमएस धोनी हा सर्वोत्तम कर्णधारांपैकी एक आहे. तसाच रोहित शर्मा एक उत्कृष्ट व्यक्ती आहे. तो संघातील प्रत्येक व्यक्तीला समजून घेतो, प्रत्येकाला काय आवडते आणि काय आवडत नाही हे त्याला माहित आहे. तो समजूतदार आहे आणि प्रत्येकाला ओळखण्याचा प्रयत्न करतो. त्याची मेहनतही प्रचंड आहे. त्याने किती वेळा झोपेवर पाणी सोडलंय. तो प्रत्येक मीटिंगचा भाग असतो. प्रत्येकाला संघाने ठरवलेले डावपेच समजावून सांगतो.

दुसरीकडे विराट कोहलीची रोहितला चांगली साथ लाभत असल्याचे अश्विनने नमूद केले. या दोन्ही खेळाडूंनी संघातील प्रत्येकाला स्वातंत्र्य दिले होते. एक माहोल तयार केला होता. भारतीय क्रिकेटमध्ये असे नेतृत्व तयार होणे ही मोठी प्रगती आहे, असेही अश्विन म्हणाला.

## 'त्या' कृतीवर मिचेल मार्शचे बेताल वक्तव्य

**सिडनी : वृत्तसंस्था**

वर्ल्डकप फायनलमध्ये भारताचा पराभव करून सहाव्यांदा वर्ल्ड चॅम्पियन बनलेल्या ऑस्ट्रेलियाला त्यांच्या एका खेळाडूने ट्रॉफीवर पाय ठेवत फोटो काढल्याने भारतीय क्रिकेट चाहत्यांच्या रागाला सामोरे जावे लागले. ड्रेसिंग रूममधून मिचेल मार्शचा एक फोटो व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये तो ट्रॉफीवर पाय ठेवून बसला आहे. या चित्रावरून बराच गदारोळ झाला होता. आता ११ दिवसांनंतर मार्शने या संपूर्ण घटनेवर मौन सोडले आहे.




ऑस्ट्रेलियन मीडियाशी बोलताना या अष्टपैलू खेळाडूने सांगितले की, असे करून ट्रॉफीचा अनादर करण्याचा आपला हेतू नव्हता. मार्श म्हणाला, साहजिकच त्या चित्रात कोणाचाही अपमान करण्याचा हेतू नव्हता. मी याबद्दल फारसा विचार केला नाही. मी सोशल मीडियावर फारसे पाहिले नाही. होय, हे प्रकरण चिघळले होते, मात्र आता त्यावरची चर्चा थांबली आहे. असे जरी असले तरी त्या चित्रात वादग्रस्त असे काहीही नव्हते.

ऑस्ट्रेलियन सेन रेडिओ नेटवर्कवर निवेदकाने त्याला पुढे प्रश्न विचारला की, ती कृती तू पुन्हा करशील का? असे विचारले असता, मार्श म्हणाला, होय, मी पुन्हा तसेच करेन. मला नक्कीच आशा आहे की, सर्व क्रिकेट चाहते मला समजून घेतील, कारण त्यात अपमानास्पद काहीही नव्हते. मी त्याचा तसा फारसा विचार केला नाही. मी फारसे सोशल मीडियाकडे पाहिलेही नाही. त्यात मला वाईट असे काहीही वाटत नव्हते.

### तक्रार दाखल, अहवालाची प्रतीक्षा

मार्शच्या या कृतीवर उत्तर प्रदेशातील एका कार्यकर्ता गटाच्या नेत्याने गेल्या आठवड्यात या अष्टपैलू खेळाडूविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली होती. भ्रष्टाचारविरोधी सेना प्रमुख पंडित केशव देव यांनी अलिगढच्या दिल्ली गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अलिगढचे पोलीस अधीक्षक (शहर) म्हणाले की, तक्रार मिळाली आहे, परंतु अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही आणि सायबर सेलकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील प्रक्रिया केली जाईल.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com